# हा शोध भारताचा

राजा मंगळवेढेकर

## साम्राज्याच्या उंबरठ्यावर

५



BVBK-0402269

प्राचीन भारताच्या सुवर्णयुगाची ऐतिहासिक कहाणी.

वाचनालय वा.वा.

२२६९

२२।७।८८

म. सं. मं. मार्ग, वाचनालय शाखा.

[illegible]

क्र. २२६९ दिनांक २२।७।८८

विषय वा.वा. क्र. ..........

## हा शोध भारताचा : ५



# साम्राज्याच्या उंबरठ्यावर

BVBK-0402269

भारतीय इतिहासाच्या क्षितिजावर चंद्रगुप्ताचा उदय झाला.

राजा मंगळवेढेकर

प्रकाशक
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७ नारायण पेठ,
दै ' प्रभातसमोर ' पुणे - ३०
फोनं - ४४९५४१.

© राजा मंगळवेढेकर
प्रकाशन दिनांक - १५ ऑगस्ट १९८८
(                    ) दुसरी आवृत्ती

मुद्रक - प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथपाराजवळ,
पुणे - ३०.

मूल्य - १००/- रूपये
१० पुस्तकांचा संच

भारत !

पाच सहस्र वर्षांचा स्फूर्तीदायक इतिहास
अभिमानाने सांगणारा हा पृथ्वीच्या पाठीवरला
प्राचीन, विशाल देश !

अनेक मानवसमूह या भूमीवर आले, वसले, नांदले.
अनेक राज्ये-साम्राज्ये उदयाला आली नि मावळली.
विविध संस्कृती, धर्म, पंथ...
विविध साहित्य, संगीत, शिल्प....
विविध शास्त्र, विज्ञान, कला...
किती तरी गोष्टींतून भारताच्या
अस्मितेची जडण-घडण झाली.
एक विदग्ध, सहिष्णू, विजिगीषू
व नित्यनूतन अशी संस्कृतीही
आकारास आली.

अर्वाचीन भारत
अशा गौरवसंपन्न प्राचीन भारताच्या
मजबूत खांद्यावरच उभा आहे.
आणि त्याच प्राचीन भारताच्या
सांस्कृतिक धडपडीचा हा
एक विनम्र शोध !

# अनुक्रम


| | |
|---|---|
| मगध-उदय | ५ |
| सिकंदरची स्वारी | १२ |
| पुरुचा पुरुषार्थ | १९ |
| सिकंदरची माघार | २५ |
| चाणक्याची प्रतिज्ञा ! | २९ |
| हवे ते गवसले | ३५ |
| चाणक्य-नीती | ४२ |
| नंद निखंदन | ५१ |
| चंद्रगुप्ताचे साम्राज्य | ५९ |
| बिंदुसार | ६७ |

२२६९ २२।१
५।५।



## मगध—उदय

माणसेच माणसांचा इतिहास घडवीत असतात. सृष्टी आपला इतिहास घडवीत असते. दोहोंचा कुठेतरी परस्पर संबंध असतोच ! नाही तरी माणूस हीसुद्धा सृष्टीनिर्मितीमधीलच एक निर्मिती.

शौर्य, धैर्य, साहस, पराक्रम, सत्य, न्याय, नीती इत्यादी अलौकिक गुणांनीच बहुधा मानवी इतिहास भरलेला आहे. शास्त्र, कला, विद्या यांचीही जोड त्याला लाभलेली आहे. परंतु सत्तापिपासा, धनलोभ, स्वार्थ, आसुरी महत्त्वाकांक्षा आदी दुर्गुणांनीही इतिहास घडवलेला आहे.

हर्यंक वंशातील मगध राजा बिंदुसार याला त्याच्या मुलानेच—अजातशत्रूनेच—कारागृहात टाकले आणि अन्नपाण्याविना उपाशी ठेवून मारले आणि आपण मगधाचा सत्ताधीश बनला.

अजातशत्रूच्या पश्चात मगधाच्या गादीवर कोण राजा आला याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. पुराणांच्या मते असे दिसते की, अजात-

शत्रूच्या पश्चात त्याचा पुत्र दर्शक हा राजा झाला. महाकवी भास याने आपल्या 'स्वप्न वासवदत्ता' नामक नाटकात दर्शक राजाचा उल्लेख केलेला आहे. दर्शक राजाच्या बहिणीचा विवाह कौशाम्बीचा राजा उद-यन याच्याशी झालेला होता असेही भासाने दाखवले आहे, पण याला अन्य आधार मिळत नाही.

'महावंश' नामक बौद्धग्रंथानुसार अजातशत्रूच्या पश्चात उदयभद्र नामक राजा झाला असे दिसते. याला बौद्धग्रंथांनी अजातशत्रूचा पुत्र मानले आहे. परंतु जैनग्रंथांनी उदयभद्र हा कुणिकपुत्र होता असे म्हटले आहे.

अजातशत्रूप्रमाणेच उदयभद्र याने देखील पितृहत्त्या केली असे बौद्ध-ग्रंथांनी म्हटले आहे. परंतु अजातशत्रूला पितृहन्ता मानण्याच्या बाबतीत जैन आणि बौद्ध ग्रंथांचे जसे दुमत दिसते, तसेच उदयभद्राच्या बाबतीतही आढळते. जैन ग्रंथ उदयभद्राला पितृहन्ता मानीत नाहीत, उलट पित्याच्या निधनवार्तेने शोकाकुल होऊन हा मूर्च्छित पडला होता, असे त्याच्या पितृभक्तीचे वर्णन करतात. त्यावेळी तो चम्पा येथे राज्याधिकारी होता. चम्पा नगरी आजच्या हिमाचल प्रदेशात आहे. पित्याच्या निधनानंतर हा पाटलीपुत्राला आला.

उदयभद्रानेच याला उदायी असेही म्हटलेले आहे. 'कुसुमपूर' नग-रीची म्हणजे नवीन पाटलिपुत्राची स्थापना याने केली असा वायू पुराणात उल्लेख आढळतो.

उदयभद्र हा जैन मताचा पुरस्कर्ता होता व त्याने नगरीच्या मध्यवर्ती ठिकाणी चैत्यगृह बांधले होते, असे जैनांच्या आवश्यक सूत्रांत म्हटले आहे. यावरून असे दिसते की, आपल्या मताच्या राजाला चांगले म्हण-ण्याची कामगिरी त्या त्या धर्ममतांच्या ग्रंथांनी बजावलेली आहे.

उदयभद्र राजाचा अंत एका कटात झाला. त्याच्या पश्चात अनुरुद्ध,

मुण्ड व नागदाशक नामक राजे झाले, असा बौद्ध ग्रंथांत उल्लेख असला तरी जैन ग्रंथांनी उदयभद्राला वारसच ठेवलेला नाही. पुराणांच्या मतानुसार उदायीच्यानंतर नंदीवर्धन अथवा महानन्दिन हा राजा झाला होता. 'दर्शक' राजाचा उल्लेख पुराणांनी केला आहे; हाच नागदर्शक किंवा नागदाशक असावा.

दर्शकानंतर शैशुनाग किंवा शिशुनाग हा सिंहासनावर आला. त्याने इसवी सनापूर्वी ४५३ पर्यंत राज्य केले. हा एक महान विजेता राजा होऊन गेला. अवन्तीचा प्रद्योत वंश याने नष्ट केला. अवन्तीवर्धन नावाच्या या वंशातील अखेरच्या राजाला ठार करून अवन्तीचे राज्य याने आपल्या राज्यात समाविष्ट करून टाकले. वत्स व कोशल या वंशांची अखेर शिशु-नागाच्या काळीच झाली. वत्सचा अखेरचा राजा क्षेमक व कोशलचा अखेरचा राजा सुमित्र यांचा त्याने पराभव केला व त्यांची राज्ये मगध साम्राज्यात विलीन करून टाकली. या विजयामुळे शिशुनाग राजा हा आर्यावर्ताच्या एका मोठ्या भागाचा स्वामी बनला होता. याने चौदा वर्षे राज्य केले. हा राजनीतीकुशल असा शासक होता. यानेच सर्वप्रथम मगध राजाला साम्राज्याचे स्वरूप दिले. ज्याला खऱ्या अर्थाने सम्राट म्हणता येईल असा हा पहिला मगध–सम्राट होता.

शिशुनाग राजाच्या मृत्यूनंतर इ० स० पू० ३९३ मध्ये त्याचा पुत्र कालाशोक मगध सिंहासनावर आला.

कालाशोक याचे मूळ नाव अशोक होते. परंतु त्याच्या काळ्या वर्णा-मुळे त्याला कालाशोक हे नाव पडले. 'काकवर्ण' असेही त्याला म्हटले जाई. याने छत्तीस वर्षे राज्य केले. हा देखील एक यशस्वी राज्यकर्ता होता. परंतु याच्या विरुद्धही काही लोक राज्यात होते आणि या लोकांचा नेता होता महापद्म नंद !

भारताच्या इतिहासात नंदवंशाचा उदय इसवी सनापूर्वी ४२५ च्या

सुमारास झाला. नंदवंश सत्तेवर आला. महापद्म नंद हा पहिला सम्राट बनला.

येथेही इतिहासातील अद्भुत घटनांचे दर्शन घडते.

महापद्म नंदाची अशी दंतकथा सांगतात की हा कालशोक राजाच्या दरबारी होता. हा मोठा मुत्सद्दी व महत्त्वाकांक्षीही होता. याने राणीचे मन मोहून टाकले होते. हा जातीने नापित होता. याने कालाशोक राजाला ठार करून त्याच्या दहा-पुत्रांना गादीवर बसविले. भद्रसेन, कोरण्डवर्ण, मंगुर, सरवंजह, जालिक, उम्भक, संजय, कोरव्य, नंदिवर्धन आणि पंचमक अशी त्यांची नावे होती. प्रथम यांचा पालक म्हणून याने राज्यकारभार पाहिला व पुढे या दहाही राजकुमारांना ठार मारून महापद्म नंद याने मगधाची गादी बळकावली.

पुराणांनी नंद वंशाचा संस्थापक महापद्म याला समस्त क्षत्रियांचा विनाशक–'सर्वक्षत्रांतक' असे म्हटले आहे. 'एकराट' अशा उपाधीने याला गौरविले आहे. इक्ष्वाकु, पांचाल, काशी, हैहय, कलिंग, अश्मक, कुरु, मैथिल, सूरसेन, वीतिहोत्र इत्यादी राजांचा याने पराभव केला होता व आपले साम्राज्य वाढविले होते. जैन ग्रंथांवरूनही नंदांच्या विशाल साम्राज्याचा बोध होतो. नंदांनी कलिंगवर विजय प्राप्त केला होता याची साक्ष कथासरित्सागर व हाथिगुंफा येथील अभिलेख यावरून मिळते. गोदावरीच्या किनारी असलेल्या नान्दर, म्हणजेच तत्कालीन 'नवनन्द देहरा' नामक नगरीवरून नंदांचे साम्राज्य दक्षिणेतही पसरलेले होते असे दिसते. कर्नाटकातील म्हैसूरच्या उत्तर–पश्चिमेकडील भागाला 'कुंतल' असे म्हणतात. कुंतल प्रदेशावर नंदांची सत्ता नांदत होती, असा समज आहे. परंतु काही झाले तरी भारतातील एका फार मोठ्या प्रदेशावर नंदांचे साम्राज्य होते, ही गोष्ट निर्विवादच आहे.

इतिहासकार भारताचा पहिला महान् ऐतिहासिक सम्राट म्हणून

महापद्म नंद यालाच मानतात. हा शूद्र होता याबद्दलही दुमत नाही. या दृष्टीने भारतीय इतिहासातील हीदेखील एक महत्त्वाची घटना मानली जाते. ब्राह्मणांची अवहेलना झाली, क्षत्रियांच्या हातातील राज्यसत्ता गेली, आणि ती शूद्रांच्या हाती आली व त्यांनी तिचे साम्राज्य बनविले.

महापद्म नंदाविषयी अनेक आख्यायिका आहेत. ' महावंस ' ग्रंथात याला हा एका दरोडेखोरांच्या टोळीचा नायक होता असे म्हटले आहे. याने अनेक राज्यांत लुटालूट केली व काही राज्येही जिंकली आणि अखेरीस तो मगधासारख्या एका प्रबळ देशाचा राजा बनला. महावंस ग्रंथात याला ' उग्रसेन ' नावाने संबोधिले आहे.

पुराणांनी याला ' दुसरा परशुराम ' म्हणून गौरविले आहे. क्षत्रियांच्या राजकीय वर्चस्वाची पुरातन परंपरा याने खंडित केली.

महापद्म हा जसा शूरवीर, मुत्सद्दी होता तसाच तो विद्वानांचा आश्रयदाता व विद्यांचा पुरस्कर्ता होता. याच्या राज्यकालाविषयी विद्वानांमध्ये भिन्न मते आहेत. मत्स्य पुराणानुसार याने ८८ वर्षे राज्य केले होते असे दिसते, तर वायूपुराणानुसार याने २८ वर्षे राज्य केले आहे.

महापद्म उग्रसेन याच्या पश्चात त्याच्या नंद वंशात आठ राजे झाले. म्हणजे महापद्मासह नऊ नंद राजांनी राज्य केले. हे ' नवनंद ' म्हणून प्रसिद्ध आहेत. उग्रसेन, पंडुक, पंडुगती, भूतपाल, राष्ट्रपाल, गोविषाणक, दशसिद्धक, कैवर्त व धन अशी त्यांची नावे होती. महापद्म नंदाविषयी जेवढी माहिती उपलब्ध आहे तेवढी पुढील सात नंदराजांविषयी आढळत नाही. अखेरच्या धनानंदाविषयी काही माहिती उपलब्ध आहे.

सिकंदराची जेव्हा स्वारी झाली त्यावेळी धनानंदाचीच कारकीर्द सुरू होती. ग्रीस इतिहासकारांनी धनानंदाच्या विशाल साम्राज्याचे व प्रचंड सामर्थ्याचे वर्णन केले आहे. ' धन ' नंद हे नाव देखील याला त्याच्याजवळच्या अलोट धनराशीवरूनच पडले असावे असे म्हणतात. ' कथा-

सरित्सागर' ग्रंथात याच्याजवळ ९९० कोटी सुवर्णमुद्रा होत्या असे म्हटले आहे, तर 'महावंश' ग्रंथात उल्लेख आहे की, "याच्या धनलोलुपतेमुळे याला धनानंद म्हटले जात असे. गंगानदीच्या तळामध्ये एका गुहेत याने ८० कोटी सुवर्णमुद्रांचा साठा दडवून ठेवलेला होता. धनसंपत्तीसाठी याने कातडी, डिंक, दगड इत्यादी वस्तूंवरही कर बसविला होता."

धनानंदाची सत्ता पंजाबच्या सीमेपर्यंत होती. त्याच्या सेनादलात २०,००० घोडेस्वार, २,००,००० पदाती, २,००० रथ व ३,००० हत्ती होते.


याच्या अफाट सामर्थ्याची भीती सिकंदराच्या सेनेलाही वाटली व तिने मगधावर स्वारी करण्यास सिकंदरालाही विरोध केला. त्यामुळे सिकंदराला पंजाबमधूनच परत फिरावे लागले!

असे असले तरी धनानंद हा लोकप्रिय राजा नव्हता. त्याच्या धनासक्तीमुळे त्याने जे कर बसविले होते, त्यामुळे प्रजा असंतुष्ट होती. तसेच तो शूद्र कुलातील होता म्हणूनही प्रजेच्या मनात त्याला स्थान नव्हते. तसे तर ही अप्रियता केवळ धनानंदाच्याच बाबतीत होती. असे नाही, ती साऱ्या नंद वंशाबद्दलच होती. शूद्रांना राज्याचे स्वामी म्हणून स्वीकारणे ब्राह्मणी आणि क्षत्रिय वर्चस्वाखाली वाढलेल्या परंपराप्रिय प्रजेला जड जात होते. महापद्मनंद हा बलाढ्य राज्यसंस्थापकच होता. त्याने सुमारे २८ वर्षे राज्य केले. त्यानंतर धनानंदापर्यंतच्या नंद राजांनी फक्त १२ वर्षे राज्य केले आहे. म्हणजे नंद वंशाचा राज्यकाल इसवी सनपूर्व ३६४ ते ३२४ असा सुमारे ४० वर्षांचाच ठरतो.

या अवधीत नंद साम्राज्य विस्तारले याला राजकीय दृष्टीने महत्त्व आहे. नंदांनीच तत्कालीन लहान लहान राज्यांमध्ये विखुरलेल्या प्रदेशाला एकत्र करून राजकीय एकता निर्माण केली. परंतु ते शूद्र होते व त्यांनी

पुरातन धर्म सोडून ते जैन धर्मी बनले याची खंत तत्कालीन संस्कारांमुळे प्रजेला होतीच. याविषयीचा असंतोष ग्रीक लेखकांनीही आपल्या ग्रंथात नमूद केलेला आहे. खारवेल येथील हाथीगुंफामधील अभिलेखावरूनही हे सिद्ध होते की, नंदांनी धर्म बदलला, परंपरागत ब्राह्मणधर्मानुसार त्यांनी आपल्याला राज्याभिषेकही करवून घेतला नाही व पुरातन धर्माची उपेक्षा केली हे प्रजेला आवडले नव्हते. त्यामुळे नंद राजे अप्रिय होते. धर्म उपेक्षेमुळे ब्राह्मणवर्ग, तर पराभवामुळे क्षत्रियवर्ग असंतुष्ट होता. या अशा कारणांमुळेच नव्या शक्तीचा जेव्हा पुढे उदय झाला, तेव्हा प्रजेची साथ धनानंदाला मिळाली नाही आणि नंदवंशाचे पतन झाले.

□



# सिकंदरची स्वारी

नंदवंशाच्या पतनाआधीच भारतावर परचक्राचे संकट आले होते. स्वत:ला जगज्जेता म्हणवून घेणारा ग्रीक बादशहा अलेक्झांडर दि ग्रेट याची दृष्टी भरतभूमीकडे वळली होती आणि तो आपल्या अफाट सेनेसह भारतात इसवी सनापूर्वी ३२७ मध्ये आला होता.

ग्रीस हा भारताप्रमाणेच युरोपमधील सर्वांत प्राचीन देश आहे. भारताचा व ग्रीसचा संबंध इराणी साम्राज्यामार्फत आला होता. कारण इराणी साम्राज्य हे पश्चिमेकडे ग्रीसपर्यंत व पूर्वेकडे भारताच्या पश्चिमोत्तर सीमेपर्यंत पसरलेले होते. ग्रीकांच्या एका शाखेचे नाव 'आयोनियन' असे आहे. त्यावरून त्यांना इराणी लोक 'योन' म्हणत असत आणि या योन शब्दावरूनच भारतात त्यांना 'यवन' म्हटले जाऊ लागले. भारताच्या नावाबद्दलही असाच प्रकार झाला आहे. 'सिंधु' नदीच्या नावावरून इराणी भारताला 'हिंदु' म्हणत असत. हिंदु शब्द ग्रीसमध्ये

जाईतोपर्यंत ‘ इण्ड ’ झाला. याचेच पुढे ‘ इण्डिया ’ असे रूप बनले.

ग्रीसच्या उत्तरेला लागूनच मॅसिडोनिया नावाचा देश आहे. या देशात फिलीप नावाचा राजा राज्य करीत होता. फिलीप हा मोठा शूर-वीर व दक्ष शासक होता. त्याने सुसज्ज व लढाऊ असे मोठे सैन्य उभारलेले होते व त्या बळावर बराचसा प्रदेश आपल्या सत्तेखाली आणलेला होता. या पराक्रमी फिलीप राजाचा अलेक्झांडर हा महान्-ग्रेट-पुत्र ! याला ‘ सिकंदर ’ असेही म्हणतात. जागतिक इतिहासात सिकंदरला खूपच श्रेष्ठत्व दिलेले आहे, पण पं. जवाहरलाल नेहरूंना मात्र हा ‘ विख्यात जेता पण घमेंडखोर तरुण ’ वाटतो. नेहरू म्हणतात, “ इतिहासात त्याची प्रसिद्धी फार मोठी आहे. परंतु त्याने जे काही करून दाखविले त्यांपैकी फार मोठा भाग, त्याच्यापूर्वी त्याच्या बापाने जे पुष्कळ कार्य काळजीपूर्वक उभारून ठेवले होते, त्याच्या जोरावरच त्याला साधता आला. ॲलेक्झांडर खरोखर श्रेष्ठ पुरुष होता की नाही ही संशयास्पद गोष्ट आहे. मला तरी तो कोणी आदर्श पुरुष किंवा विभूती वाटत नाही. परंतु अगदी थोडक्या आयुष्यात आशिया आणि युरोप या दोन भू-खंडांमध्ये आपल्या नावाचा दरारा बसविण्यात त्याला यश मिळाले हे खरे. आणि इतिहासामध्ये ‘ पहिला जगज्जेता ’ असे त्यास समजतात. खरोखर तो श्रेष्ठ पुरुष असो वा नसो, इतिहासात तरी त्याच्या नावाभोवती कीर्तीचे मोठेच तेजोवलय उभारण्यात आले आहे. किती एक शहरांना त्याचे नाव देण्यात आले आहे. त्यांपैकी काही आजही अस्तित्वात आहेत. त्यांतले पूर्वीच्या काळातील सर्वांत मोठे शहर म्हणजे इजिप्त मधील ‘ अलेक्झांड्रिया ’ हे होय. ”

राजा झाला त्यावेळी हा अवघ्या वीस वर्षांचा होता; पण त्याची महत्त्वाकांक्षा मात्र विलक्षण जबर होती. ‘ ग्रेट ’ बनण्याची त्याची इच्छा दुर्दम्य होती. श्रेष्ठत्व संपादण्याच्या आकांक्षेने त्याचे मन भारून गेलेले

होते. बापाची सुसज्ज सेनाही हाताशी होती. त्याचे बाहू स्फुरण पावू लागले, तेव्हा त्याने प्रथम इराणवर स्वारी करण्याचे ठरवले. कारण इराण हा त्याच्या देशाचा जुना शत्रू होता. मॅसिडोनियाच्या या प्रबळ राजापुढे ग्रीकांनीही मान तुकविली होती. पण त्यांतही एक थीब्स नावाचा असा राजा निघालाच की ज्याने सिकंदराचे आधिपत्य नाकारून त्याच्या विरुद्ध बंडाचे निशाण उभारले. पण सिकंदरच्या बळापुढे त्याला टिकाव धरता आला नाही. सिकंदरने त्याच्यावर भयंकर हिंस्र असा हल्ला चढवला. त्याच्या विख्यात राजनगरीचा विध्वंस करून टाकला. प्रचंड वास्तू धुळीस मिळविल्या. तेथील असंख्य लोकांची त्याने अमानुषपणे कत्तल केली. कित्येकांना गुलाम बनवून विकून टाकले. सिकंदरच्या शौर्याचा दबदबा हा असल्याच प्रकारचा होता.

त्याने इराणवर चढाई केली त्या वेळी तिथे क्सर्क्झीझ बादशहाच्या पश्चात आलेला दारियस किंवा डरियस–तृतीय नामक बादशहा राज्य करीत होता. या इराणी लोकांनीही भारताच्या उत्तर-पश्चिम भागावर इसवी सनापूर्वीच्या सहाव्या शतकात आपले हातपाय पसरले होते. अखामनी साम्राज्याचा निर्माता सायरस, डरियस प्रथम किंवा दारायवुश यांच्या आक्रमणाचे उल्लेख आढळतात. पहिल्या डरियसच्या पश्चात झरक्षीज किंवा क्षयार्ष बादशहा बनला. याच्याही अमलाखाली काही भारतीय राज्ये होती. इसवी सनापूर्वी ३३१ मध्ये सिकंदरने अरबेलाच्या युद्धात अखामनी साम्राज्य धुळीस मिळविले. त्याची राजधानी ‘पर्सिपोलस’ भस्मसात करून टाकली. तिसऱ्या डरियसचा पाडाव केला. त्याच्या पाठोपाठ ईजिप्त देशही सिकंदरने जिंकला. त्यानंतर पुनश्च डरियसवर हल्ला करून त्याने त्याचा दुसऱ्यांदा पराभव केला. डरियसचा राजवाडा जाळून टाकला.

फारसी भाषेत सुमारे एक हजार वर्षांपूर्वीचा ‘फिर्दोसी’ नामक

कवीने लिहिलेला 'शाहनामा' नामक जगप्रसिद्ध असा एक ग्रंथ आहे. फिर्दोसीने या ग्रंथात इराणच्या राजवंशाचा इतिहास वर्णिलेला आहे. सिकंदर व डरियस यांच्या लढायांची वर्णनेही आहेत. त्यात असे म्हटले आहे की, डरियसचा जेव्हा पराभव झाला तेव्हा त्याने हिंदुस्तानातून मदत आणविण्याचा प्रयत्न केला. हिंदुस्तानच्या वायव्य भागात त्यावेळी 'पुरु' किंवा 'पोरस' नावाचा राजा राज्य करीत होता. डरियसने पुरुकडे 'वायुवेगाने जाणारा एक उंट (सांडणीस्वार) पाठवला' परंतु पुरुराजा त्याला काहीच मदत पुरवू शकला नाही. लौकरच त्याला स्वतःला सिकंदरच्या हल्ल्याला तोंड द्यावे लागले.

फिर्दोसीच्या शाहनाम्यात इराणचे राजेमहाराजे हिंदी बनावटीच्या तरवारी व जंबिये वापरीत असत असे अनेक उल्लेख आढळतात. त्यावरून असे दिसून येते की सिकंदरच्या काळीसुद्धा हिंदुस्थानात पाणीदार पोलादाच्या तरवारी तयार होत असत आणि परदेशातसुद्धा त्या अतिशय प्रसिद्ध असत.

इराणचा पाडाव केल्यानंतर अफगाणिस्तानातून हिंदुकुश पर्वत ओलांडून सिकंदर काबूल नदीच्या उत्तरेकडे निघाला. तिथे त्याला 'कूनर' व 'स्वात' या खोऱ्यांमध्ये सर्वप्रथम एका आश्वयकायन नामक भारतीय जमातीच्या लोकांशी युद्ध करावे लागले. आश्वयकायन लोक शूर होते. त्यांनी ठिकठिकाणी सिकंदरला निकराचा प्रतिकार केला. यात त्यांचा पराभव झाला, पण त्यांचे शौर्य पाहून ग्रीक सैन्यही आश्चर्यचकित झाले! या आश्वकायनांचे मुख्य शहर 'मसगा' नावाचे होते. 'संस्कृत ग्रंथात 'मशकावती' नगरीचा उल्लेख आढळतो, तो बहुधा याच नगरीचा असावा. मशकावतीचे संरक्षण करण्याचा प्रयत्न आश्वकायनांनी पुष्कळ केला. प्राणांची बाजी लावली. मोठे युद्ध झाले. पण ही नगरी काही सिकंदरच्या हाती पडली नाही. या नगरीच्या रक्षणासाठी पंजाब-

मधून ७००० सैनिक आले होते. सिकंदरने त्यांना वचन दिले की, जर ते मशकावती सोडून परतले तर त्यांची हत्त्या करणार नाही. या समझोत्यानंतर ते लोक आपल्या स्त्रियांसह परतले. पण रात्र झाल्यावर त्यांच्यावर अचानक खुनशी हल्ला चढवून सिकंदरने त्यांची कत्तल केली. वचन दिले असताना असा हल्ला केला याविषयी सिकंदरने त्यांना उर्मटपणाने उत्तर दिले की, ‘वचन नगरीतून निघून जाईपर्यंत न मारण्याचे दिले होते. निरंतर मैत्रीचे नव्हे!’

तरीही ते भारतीय शूर धैर्याने लढले. पुष्कळसे वीर पुरुष मारले गेले. तेव्हा त्यांची शस्त्रे त्यांच्या स्त्रियांनी हाती घेतली व त्या लढू लागल्या. परंतु सिकंदरच्या सामर्थ्यापुढे त्यांना टिकाव धरणे अशक्य होते. त्यांनाही वीरगती मिळाली. प्लुटार्क नामक लेखकाने या भीषण घटनेबद्दल लिहिताना म्हटले आहे की, ‘सिकंदरच्या कीर्तीवर लागलेला हा काळाकुट्ट असा डाग आहे.’

कूनर व स्वात या नद्यांच्या खोऱ्यातच पुढे बहुधा कोहेमार पर्वताच्या पायथ्याशी ‘नीसा’ नामक नगरी होती. सिकंदर या नगरीत जेव्हा पोचला तेव्हा तेथील लोकांनी आपण ग्रीक संतान आहोत असे सांगून त्याचे स्वागत केले. ‘डायोनीसिस’ या ग्रीक देवतेच्या नावाशी ‘नीसा’ या नगरीचे साम्य लक्षात घेऊन व तेथील पहाडीवर द्राक्षवेलींच्या बागा पाहून त्याने त्यांचा स्वीकार केला. या लोकांनी ३०० घोडेस्वारांची एक तुकडी सिकंदरला दिली!

काही महिन्यांच्या आतच सिकंदरने सिंधू नदीच्या पश्चिमेकडील बराचसा भाग जिंकून घेतला. पुष्कलावती नगरी ताब्यात घेतली. ठिकठिकाणी आपले पदाधिकारी ठेवले. अनेक लहान लहान राज्ये जिंकीत सिकंदर सिंधू नदीच्या काठी आला. उद्‌भाण्डपूर येथे नौकांचा पूल त्याने तयार केला होता.

या सुमारास पश्चिमोत्तर भारतात पंजाब व सिंध या प्रदेशात दुर्दैवाने अनेक छोटी छोटी राज्ये विस्कळितपणाने नांदत होती. त्यांचे एकमेकांत वैर, मत्सर व द्वेष भावना होती. त्यामुळे सिकंदरच्या या परकी प्रचंड आक्रमणाला प्रतिकार करण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ नव्हते.

सिंधूच्या पूर्वेला आल्यावर प्रथम भेटणारे राज्य होते — पूर्व गांधार. याची राजधानी होती प्रसिद्ध नगरी तक्षशिला! तक्षशिलेचा राजा आम्भि याने सिकंदरला विरोध तर केला नाहीच, पण सिकंदरला ७०० घोडेस्वार, ३० हत्ती, कित्येक बैल, बकऱ्या व चांदी-सोने यांचा नजराणा दिला!

इसवी सनापूर्वी ३२६ मध्ये वसंत ऋतूत सिकंदरने आपल्या सेनेसह सिंधूनद ओलांडला. आम्भिने त्याच्या स्वागतार्थ तक्षशिलेचे महाद्वार खुले केले. तक्षशिला नगरीला त्या काळी विद्या व व्यापार या दृष्टीने फार महत्त्व होते. तक्षशीला विद्यापीठ त्याकाळी भारतातच केवळ नव्हे, तर परदेशातही अतिशय ख्याती पावलेले होते. देशोदेशीचे विद्यार्थी या विद्याकेंद्रात अध्ययनासाठी येत असत.

तक्षशिला नगरीमध्ये आम्भिराजाने सिकंदराचा मोठा सत्कार केला. सिकंदरने इराणहून आणलेल्या अनेक बहुमूल्य वस्तू आम्भिला भेट दिल्या व आपली उदारता प्रकट केली.

याच मुक्कामात सिकंदरने तक्षशिलेच्या विद्वत ख्यातीबद्दल व भारतीय तपस्वी, विद्वान यांच्याबद्दलही खूप ऐकले. हे सारे ऐकून सिकंदरने या विद्वानांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली.

त्या काळी तक्षशिलेत प्रसिद्ध पंडित दण्डी राहात होता. त्याच्या आश्रमात पुष्कळ शिष्य अध्ययन करीत असत.

सिकंदरने आपल्या दूताला दण्डीकडे धाडले. दूताने आश्रमात येऊन सांगितले, "शक्तिशाली ज्यूस देवतेचा पुत्र व संपूर्ण मानव जातीचा

अधिश्वर सम्राट सिकंदर यांनी आपल्याला बोलावले आहे. आपण याल तर कित्येक बहुमूल्य उपहार मिळतील, न याल तर मृत्युदंड मिळेल."

दूताचा निरोप ऐकला आणि दण्डीने शांतपणाने उत्तर दिले,

"सर्वांचा प्रतिपालक व न्यायी असा जो परमेश्वर आहे त्यालाच मी केवळ वंदन करीत असतो. सिकंदर देव होऊ शकत नाही, कारण एके दिवशी त्यालाही मरायचे आहे. तसेच मानवजातीचाही स्वामी तो होऊ शकत नाही, कारण कित्येक राष्ट्रांनी त्याचे नावसुद्धा ऐकलेले नाही. सिकंदरच्या उपहारांची मला गरजच नाही, कारण माझ्या आश्रमातील ह्या वृक्षवेली माझ्या गरजा भागवीत आहेत. आणि माझे शीर उडवले तर त्या-योगेही माझे काही नुकसान होणार नाही, कारण हे शरीर नश्वर असून आत्मा अमर आहे. ब्राह्मणाला धनाविषयी आसक्ती नसते, आणि मृत्यू-बद्दल भीती नसते. तेव्हा हे दूता ! सिकंदरला जाऊन सांग की, दण्डीला तुझ्यापासून कशाचीही अपेक्षा नाही; म्हणून तो तुझ्याकडे येणार नाही. परंतु जर तुलाच काही दण्डीपासून हवे असेल तर तू दण्डीकडे येऊ शकतोस !"

अनेक राजांच्या पराभवाने मिळालेले सिकंदरचे यश तपस्वी दण्डीने या उत्तरानेच धुळीत मिळविलेले होते !

अशाच एका भारतीय राजाशीही सिकंदरची अद्याप गाठभेट व्हायची होती. आणि तो महान राजा म्हणजे पुरु !

□

# पुरुचा पुरुषार्थ

तक्षशिलेचा आम्भी राजा शरण गेल्यावर आसपासच्या लहान, लहान राज्यांनीही त्याचेच अनुकरण केले. ज्याचा आधार मानायचा तो वटवृक्षच उन्मळून पडल्यावर झाडाझुडुपांनी सोसाट्याच्या वाऱ्या-वादळात तग तरी कसा धरायचा ?

तक्षशिलेच्या आम्भीचाही सिकंदरला वश होण्यातील अंतरहेतू वेगळाच होता. त्याचे आणि पुरुचे बरे नव्हते, तसेच अभिसारच्या राजाशीही त्यांचे वाकडे होते. पुरु आणि अभिसार नरेश यांची मैत्री होती. ती आम्भीला बरेच डाचत होती. पण स्वतःच्या बळावर त्यांना खाली नमविणे हे आम्भीच्याही शक्तीबाहेरचे होते. या द्वेषमत्सराच्या पोटीच आम्भीने सिकंदराच्या आगमनाची संधी साधली आणि केवळ पुरु व अभिसार नरेश यांच्या वरचढ होऊन त्यांना नीच लेखण्याच्या बुद्धीनेच त्याने देशद्रोह केला आणि परक्या सिकंदरला येथे, काही काळ

तरी पाय ठेवू दिला. इतिहासात अशी आख्यायिका आहे की, सिकंदरने धनलोलुप आम्भीला अठ्ठेचाळीस लाख रुपये दिले व त्याला आपल्या बाजूला वळवून घेतले. आम्भीने त्या बदली ५,००० सैनिक सिकंदरला दिले. हे सगळे पुरुचा नक्षा उतरविण्यासाठी!

तक्षशिलेचा आम्भी, पुष्कलावतीचा संजय, काबूलचा कोफायस, अश्वजित अथवा शशिगुप्त हे सारे सिकंदरला वश झाले.

पुरु मात्र एक वीर असा निघाला की ज्याला आपल्या मायभूमीला परक्यांचे पाय लागणे सहन झाले नाही! तो ताठपणाने सिकंदरच्या प्रबळ सेनेशी झुंज घ्यायला केवळ एकाकी उभा राहिला. त्याचा स्नेही अभिसार नरेशही साथीला आला नाही. असे सांगतात की अभिसार नरेशानेही तक्षशिलेत असताना सिकंदरला गुप्तपणाने नजराणा धाडला होता.

पुरु एकटा-एकाकी राहिला. तरी पण आपल्या स्वातंत्र्यनिष्ठेपासून ढळला नाही.

तक्षशिलेहून सिकंदरने अन्य राजांप्रमाणेच पुरुलाही आत्मसमर्पणा-साठी निमंत्रण धाडले होते. इतरांनी त्या धमकीला घाबरून सिकंदरपुढे शरणागती पत्करली, पण बहाद्दर पुरुने सिकंदरलाच उलट जबाब धाडला की, "आपली भेट रणांगणावरच होईल!"

राजांकडून शरणागतीचे नजराणे पत्करणाऱ्या सिकंदरला पुरुने धाडलेले बाणेदार उत्तर ऐकून संताप आला, त्याच्या क्रोधाचा पारा कमाल चढला. तशात आम्भीने आणखी आगीत तेल ओतले आणि ती भडकावली!

सिकंदरने आपली सेना सज्ज केली. आम्भीचे पाच सहस्र सैनिक घेतले आणि तो पुरुच्या राज्यावर चालून निघाला. दूताकरवी जबाब दिल्यावर त्याच्या परिणामाची कल्पना पुरुलाही होतीच. त्याने आपले

बळ एकवटले. अभिसार नरेशाकडे साहाय्याची मागणी केली. पण ऐन-वेळी त्याने नकार देऊन मित्रद्रोहाबरोबरच देशद्रोहदेखील केला.

झेलम नदीच्या पश्चिम तटावर सिकंदरची सेना येऊन धडकली. तेव्हा पूर्वतटावर पुरुची सेनाही प्रतिकारार्थ युद्धाच्या पवित्र्यात उभी होती. वर्षा-ऋतूचा काळ होता. झेलम दुथडी भरून वाहात होती. वेगवती झेलम पार करणे सिकंदरच्या सेनेला त्यावेळी तरी अशक्य होते. सेना तिथेच ऐलतिरी थबकली. उसळत्या झेलमच्या पैलतिरी पुरुची ३०,००० पायदळ, ४,००० घोडदळ, ३०० रथ व २०० हत्ती अशी विशाल सेना पसर-लेली होती. ही सेना पाहून सिकंदरच्या सेनेला धडकी भरल्याशिवाय राहिली नाही.

झेलम पार करणे अवघड आणि पार केलीच तर या स्वातंत्र्यरक्षणा-साठी सिद्ध झालेल्या शूर सेनेशी गाठ! सिकंदरनेही हे जाणले आणि ऐल-तिरावरच तळ ठोकला. कित्येक दिवस लोटले. आठवडे पूर्ण झाले. सिकंदर पुरुवर कशी चढाई करावी याच्याच विचारात गढला होता. आणि अखेरीस ' सिकंदर कधी विजय चोरणार नाही ' अशी प्रौढी मिरवणाऱ्या विजयधुंद सिकंदरावरही इथे ' वाट चोरी ' करण्याचा प्रसंग आला.

इराणवरील हल्ल्याच्या वेळची गोष्ट आहे. दारायबहुच्या विशाल सेनेच्या पुढ्यात सिकंदरची ग्रीक सेना उभी होती. ती विशाल सेना पाहून ग्रीक शिपायांचे नीतीधैर्य खच्ची होऊ नये म्हणून काही ग्रीक सेनापतींनी सिकंदरला असा सल्ला दिला की, " सूर्यप्रकाशात या विशाल इराणी सेनेशी लढा देण्याऐवजी रात्रीच्या अंधारात तिच्यावर हल्ला चढवावा हे बरे! "

पण यावर सिकंदरने ही कल्पना झटकन् धिक्कारून टाकली आणि तो म्हणाला.

" सिकंदर कधी विजय चोरणार नाही ! " पण आज पुरुच्या सेनेपुढे मात्र त्याच गर्वोन्नत सिकंदरला 'वाट चोरी' करण्याची पाळी आली होती.

झेलमला उतार पडेना. पाऊसही थांबला. शत्रू पलीकडेच अडकून पडलेला. यामुळे पुरुच्या सेनेत थोडी ढिलाई आली. ती तशी निर्धास्त बनली. याचा फायदा सिकंदरने उठवला. आपल्या सेनेत नाच-गाण्याची धमाल उडवून दिली. ती पाहूनही आताच आक्रमण होत नाही अशी पुरुच्या सेनेची कल्पना झाली. अशा अवस्थेतच एके दिवशी ११००० निवडक सैनिक बरोबर घेऊन झेलमच्या किनाऱ्याने १७ मैल सिकंदर वर गेला आणि तिथून गुपचूपपणाने त्याने झेलम नदी ओलांडली. पुरुची सेना व सिकंदरची सेना यांच्यामध्ये एक लहानसा डोंगराळ भाग होता. त्यामुळे सिकंदरचा हा वाटचोरपणा पुरुच्या सेनेला दिसला नाही. मुसळधार पावसात व विजांच्या गडगडाटात सिकंदरने डाव साधला.

परंतु थोडयाच वेळात ही वार्ता पुरुला कळली. त्याबरोबर त्याने आपल्या पुत्राला दोन हजार योद्धे व एकशेवीस रथ देऊन आक्रमकांचा रस्ता रोखण्यास धाडले. तोवर सिकंदरची सेना झेलम ओलांडून आली होती. सिकंदरासारख्या सेनानायकाच्या विशाल सेनेपुढे पुरुपुत्राचा निभाव लागणे शक्यच नव्हते. त्याने निकराने प्रतिकार केला, पण तो त्यावेळीच कामी आला. पुरुच्या सेनेचीही मोठी हानी झाली.

हे कळताच पुरु स्वतः रणक्षेत्रात उतरला. पुरुचे सैन्य जसे मोठे होते, तशीच त्याची व्यूहरचना देखील अभिनव होती. त्याने आघाडीला भारी गजदल उभे केले. आजूबाजूला पायदळ ठेवले. दोन्ही बाजूला पार्श्वभागी अश्वदळ व त्यापुढे रथ उभे केले. कर्रीच्या रणक्षेत्रावर अशा सिद्धतेने पुरुची भारत सेना सज्ज होती. ती पाहून सिकंदरचेही साहसी मन दबले. तो म्हणाला,

" आजचा हा धोकादायक प्रसंग आहे. माझ्या साहसावर अतिक्रमण होऊ लागले आहे. तयार आणि असाधारण वीरांशी आजचे युद्ध आहे. "

तेवढ्यात ग्रीक घोडेस्वारांनी भारतीय सेनेची डावी फळी प्रखर हल्ला करून फोडली. बाणांचा वर्षाव सुरू केला. युद्ध पेटले. पुरुचे वीरही प्राणपणाने लढू लागले. पण त्यांना तीर चालवणे जड जात होते. आदल्या दिवशी पडलेल्या पावसामुळे जमीन निसरडी बनली होती व लांब धनुष्याचे खालचे टोक त्यामुळे जमिनीवर ठरत नव्हते. पावसाने सर्वत्र चिखल झाला होता. त्यामुळे रथही कुचकामी ठरले. त्यांची चाके चिखलात रुतून बसल्यामुळे त्यांचा काही उपयोगच होईनासा झाला. थोड्या वेळा-नंतर सिकंदर स्वतः आघाडीला आला. अनेक अडचणी येऊनही भारतीय सेना जिद्दीने लढत होती. पण पुरुची मदार होती त्याचे धनुर्धर व रथ यांवर आणि तेच असमर्थ ठरले. ग्रीक सैन्याने गजदळाचीही दाणादाण केली. त्यांनी मोठ्या हिमतीने जवळ जाऊन त्याच्या पायावर कुऱ्हाडीचे घाव घातले. तिरंदाजांनी डोळे फोडले. या भयंकर प्रकारामुळे हत्ती पिसाळले आणि उन्मत्त होऊन सैरभैर धावू लागले. त्यामुळे पुरुच्या सैन्यात एकच गदारोळ उठला. पळापळ सुरू झाली. कित्येक हत्तींच्या पायांत चिरडून मेले!

पुरु मात्र धैर्याने आपल्या हत्तीवर बसून शर्थीने लढत होता. त्याचे रणकौशल्य व शौर्य पाहून सिकंदरही चकित झाला! त्याने पुरुकडे आंभीमार्फत संदेश धाडला, " हत्यार खाली ठेव! "

परंतु बहादूर पुरुने तो ऐकूनही घेतला नाही व तो तसाच लढत राहिला. आंभी येताना पाहून त्याचे मन त्याच्याविषयीच्या घृणेने खवळून गेले आणि आंभीच्या दिशेने जोराने भाला भिरकावला. आंभीने तो कसाबसा चुकवला म्हणूनच त्यावेळी तो वाचला!

अखेरीस पुरुही पार थकून गेला. तहानेने त्याचा घसा सुकून गेला. तो आपल्या हत्तीवरून खाली उतरला. घोटभर पाणी प्याला आणि आता पराभव अटळ आहे हे जाणून तो सरळ सिकंदरापुढे जाऊन उभा राहिला. पृथ्वीवरचे दोन वीर एकमेकांपुढे उभे होते. पुरुच्या पराक्रमाने सिकंदर दिपून गेला होता. त्याने पुरुला विचारले,

" पौरस ! आपल्याशी मी आता कशा प्रकारे व्यवहार करावा ? "

यावर पुरुने चटकन जबाब दिला, " ज्याप्रमाणे एक राजा दुसऱ्या राजाशी व्यवहार करीत असतो, त्याप्रमाणे ! "

हे खणखणीत, बाणेदार उत्तर ऐकून तर सिकंदर चमकलाच; पण त्याला या आपल्या विरोधकाचेही मोठे कौतुक वाटले. आदर वाटला. पुरुशी मैत्री करण्याचे त्याने ठरवले व पुरुचे जिंकलेले राज्य तर त्याने त्याला परत दिलेच, पण आणखीही भूमी दिली !

या विजयाचे स्मारक म्हणून सिकंदरने पंजाबमधील त्या युद्धस्थळावर 'निकाइया' नावाची नगरी वसवली व झेलमच्या दुसऱ्या तटावर भारतात मृत्यू पावलेल्या आपल्या प्रिय घोड्याच्या नावाने 'बूकेफैला' नावाचे शहर उभारले.

या युद्धात सिकंदरला जय मिळाला हे जरी खरे असले, तरी त्याला भारतीय शौर्याची व स्वातंत्र्यप्रेमाची चांगलीच ओळख पटली हेही खरेच !

पुरुच्या भारतीय सेनेची या वेळी दाणादाण झाली हे जेवढे खरे, तेवढेच सिकंदरच्या सेनेलाही फार मोठी हानी पोचली हेही खरेच !

आणि म्हणून सिकंदरने पुरुसारख्या पराक्रमी व्यक्तीशी मैत्री जोडण्यात हित मानले !

□

## सिकंदरची माघार

पुरु—विजयानंतर त्याच्याशी मैत्री जोडून सिकंदरने पंजाबमध्येच काही दिवस घालवले. ग्रीक देवतांची पूजा-अर्चा, त्याप्रीत्यर्थ गीत, नृत्य अशा मौज-मजेत तो राहिला.

त्यानंतर चिनाब नदीच्या पश्चिमेला असलेल्या ‘ग्लोचुकायन’ नावाच्या क्षत्रीय जमातीवर त्याने हल्ला चढविला. त्या काळी या जमातीच्या अमलाखाली ५ ते १० हजार लोकसंख्येची सदतीस नगरे होती. सिकंदरचा हल्ला येताच हे लोक त्याला शरण आले. त्यानंतर सिकंदरने ही ३७ नगरे देखील पुरुच्या ताब्यात दिली.

तेवढ्यात सिंधूच्या पश्चिमेकडे बंड झाल्याची वार्ता सिकंदरला मिळाली. हा प्रदेश जिंकून त्याने तेथे ‘निकेनर’ नावाचा आपला प्रतिनिधी नियुक्त केलेला होता. बंडवाल्यांनी या निकेनरची हत्या केली होती. ही वार्ता कळताच सिकंदरने आपला फिलीप नावाचा अधिकारी बंडाचा

बीमोड करण्यासाठी तिकडे धाडला. फिलीपने सैन्यबळावर ते बंड मोडून काढले.

बळाने बंड मोडले तरी त्या उठावावरून एवढे सिद्ध होत होतेच की, जरी सिकंदरने या भूमीवर आक्रमण करून लहान लहान जमातीची राज्ये पादाक्रांत केली, तरी तिथल्या लोकांच्या हृदयातली स्वातंत्र्याची ज्योत विझलेली नव्हती. पारतंत्र्य झुगारून देण्यास ते उत्सुक होते!

ग्लोचुकायन लोकांचे बंड मोडल्यानंतर, आजवर तटस्थ असलेल्या किंवा छुप्या राहिलेल्या अभिसार नरेशानेही उघडपणे सिकंदरचे मांडलिकत्व स्वीकारले. चाळीस हत्ती आणि अन्य बहुमूल्य वस्तूंचा नजराणा त्याने सिकंदरकडे पाठविला.

या घटनेनंतर सिकंदरने चिनाब ओलांडली आणि पुरु राजाचा भाचा —त्याला कनिष्ठ पुरु म्हणत असत—त्याला पराजित केले व त्याचे राज्य पुरुच्या राज्यात दाखल केले.

इसवीसनापूर्वी ३२६ मध्ये सिकंदरने इरावती अथवा रावी नदी ओलांडली व ‘ अधृष्ट ’ जमातीचे मुख्य नगर ‘ प्रिम्प्रामा ’ हे जिंकून घेतले. त्यानंतर त्याने ‘ कठ ’ लोकांचे ‘ संगला ’ नामक नगर जिंकले. कठ लोक साहसी व शूर योद्धे म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्यामध्ये सौंदर्याला फार मान असे व त्यामुळे सर्वांत सुंदर अशा पुरुषाला राजा म्हणून निवडले जाई. सिकंदरच्या सेनेशी कठ लोक शर्थीने लढले. सुमारे १७,००० कठ वीर धारातीर्थी पडले, पण अखेरीस संगला नगरी सिकंदरच्या हाती पडलीच. या युद्धात कठ वीरांनी जो कडवा व घोर विरोध केला, त्याने सिकंदर चिडून, संतापून, वैतागून गेला व त्याने संगला नगरी भुईसपाट करून टाकली. कठांचा प्रदेशही सिकंदरने पुरुलाच देऊन टाकला. कारण पुरु आता सिकंदरचा मित्र बनला होता. ज्याने स्वदेश–स्वातंत्र्यासाठी प्राणाची बाजी लावली व सिकंदरशी युद्ध

केले, त्यानेच पुढे स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या कठांच्या विरुद्ध परक्या सिकंदरला साहाय्य दिले !

कठांच्या प्रदेशालगतच सौभूती नामक राजाचे राज्य होते. हा राजाही पुरुप्रमाणे भव्य व रूपवान होता. त्याने सिकंदरशी मैत्री जोडून त्याचे मोठ्या समारंभपूर्वक स्वागत केले. या राज्यातील लोकही खूप सुंदर होते व कठांच्याप्रमाणेच सौंदर्याचा आदर करीत असत. सौभूतीचे सुशासन व प्रजेतील उत्कृष्ट रीतीरिवाज याने ग्रीक लोक प्रभावित झाले. पण त्याहीपेक्षा या भागातील शिकारी कुत्र्यांमधील अद्‌भुत शक्ती पाहून ग्रीक अधिक प्रभावित झाले.

अशा प्रकारे पंचनद-पंजाब प्रदेश पार करून सिकंदर विपाशा अथवा व्यास नदीच्या काठी पोचला. व्यास नदी ओलांडून पलीकडच्या गंगा-यमुनेच्या खोऱ्यातील समृद्ध, सुपीक प्रदेश जिंकण्याची स्वप्ने तो पाहू लागला होता. पण सिकंदरला व्यास नदी ओलांडून जाण्यास त्याच्या सेनेनेच प्रखर विरोध केला. एक तर त्याचे सैन्य सततच्या युद्धाने दमून भागून गेलेले होते, आणि त्यांना आपल्या देशाची, घरादाराची आठवण बेचैन करू लागली होती. त्यांच्यापैकी अनेकांना व्याधी जडल्या होत्या, अनेकजण जखमी, अपंग बनले होते, सहकाऱ्यांच्या मृत्यूने खिन्न-उदास बनले होते. दुसरे महत्त्वाचे कारण असे होते की, पुरुशी झालेल्या युद्धात त्यांनी भारतीय सेनेचा अद्‌भुत पराक्रम पाहिलेला होता व त्यांच्या शौर्याची धास्ती त्यांना बसली होती. ते मोठ्या अनिच्छेनेच सिकंदर-बरोबर व्यास नदीपर्यंत आले होते. व्यास नदीच्या पलीकडे आणखी विशाल व शूर भारतीय सेनेशी लढावे लागणार याची त्यांना कल्पना आलेली होती. भगल नावाच्या एका राजाने सिकंदरला अग्रमीज नामक नंद राजाच्या अफाट सेनासामर्थ्याची माहिती दिली होती. ती ऐकून महत्त्वाकांक्षी सिकंदरचे बाहू फुरफुरू लागले होते, पण त्याच्या सेनेचे


धाबे दणाणून गेले होते. सिकंदरने त्यांच्यामधील अनुत्साह झटकण्याचा, व त्यांना धैर्य देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण व्यर्थ ! सिकंदरने स्वत: एकटेच व्यास पार करून जाण्याची धमकीही देऊन पाहिली, पण तीही व्यर्थ ठरली. सिकंदरचा नाइलाज झाला आणि अखेरीस त्याला सेनेच्या इच्छेपुढे मान तुकवून स्वदेशाकडे परत फिरावे लागले.

इसवी सनापूर्वी ३२५ मध्ये सिकंदरने भारतामधून काढता पाय घेतला. जाण्यापूर्वी त्याने जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावून दिली. पुरु, आंभी, यांच्या ताब्यात जसा काही प्रदेश ठेवला, तसा काही प्रदेश ग्रीक अधिकाऱ्यांच्या हातीही सोपविला.

सिकंदरचा परतीचा प्रवास अत्यंत हलाखीचा झाला. खिस्तपूर्व ३२३ मध्ये वाटेत बॅबिलॉन शहरी त्याचा अंत झाला. मायदेश मॅसिडोनिया त्याला परत दिसला नाही. मृत्यूसमयी तो केवळ तेहतीस वर्षांचाच होता. आकाशातून उल्का तुटून पडावी तसे त्याचे आयुष्य ठरले ! त्याच्या माघारी त्याच्या घराण्यात बेबंदशाही माजली आणि त्याच्या साम्राज्याचे अक्षरश: तुकडे झाले. त्याच्याविषयी अशी आख्यायिका सांगतात की, तो जगज्जेता होता व जिंकायला आता काही उरले नाही म्हणून तो एकदा रडत बसला होता ! पण हे खरे नाही. भारताच्या वायव्येकडील एक कोपरा सोडला तर सारा भारतही त्याने पाहिलेला नव्हता. चीनसारख्या अन्य अफाट देशांच्या जवळपास सुद्धा तो पोचलेला नव्हता.

सिकंदरच्या आगमनामुळे ग्रीस देशाशी भारताचे आधीपासूनच असलेले व्यापारी संबंध थोडे अधिक वाढले. दोन्ही संस्कृतींचा निकट संबंधही आला. परंतु सिकंदरच्या स्वारीचा फार मोठा किंवा खोल असा परिणाम मात्र भारतीय जीवनावर झाला नाही.

तथापि, त्याच्या स्वारीमुळे व नंतर त्याच्या मृत्यूमुळे भारतात एका प्रचंड साम्राज्याची मुहूर्तमेढ मात्र रोवली गेली ! □



# चाणक्याची प्रतिज्ञा !

सिकंदरची स्वारी झाली त्याच वेळी तक्षशीलेच्या विद्यापीठात एक महापंडित अध्यापनाचे आचार्यत्व करीत होता. हा आचार्य महा बुद्धिमान, उच्च विद्वान, चतुरस्त्र ज्ञानी, असा तर होताच, पण तेवढाच चतुर, मुत्सद्दी, राजकारणपटूही होता. याने तक्षशिलेत विद्यादान केलेच, पण भारतात अपूर्व अशी राज्यक्रांतीही घडवून आणली. याने इतिहासाचे केवळ अध्ययन-अध्यापन केले नाही, तर इतिहासही घडविला ! याने केवळ राजनीतीच शिकविली नाही, तर राजाच निर्माण केला !

या महापंडिताचे नाव होते आचार्य चाणक्य. 'चाणक्य' या शब्दाला आता राजकारणधुरंधर, थोर मुत्सद्दी, असा आशय जो प्राप्त झालेला आहे, तो याच चाणक्यावरून.

याचे खरे नाव होते विष्णुगुप्त. पण कोणी म्हणतात की बुंदेलखंडातील नागौदा जवळचे नाचना हेच 'चणक' गाव होय आणि या

' चणक ' गावावरूनच विष्णुगुप्ताला 'चाणक्य' म्हणू लागले. कोणी याला 'चणक' पुत्र म्हणून ' चाणक्य ' नाव पडले असे म्हणतात.

चाणक्याला ' कौटिल्य ' असेही एक नाव आहे. ' कौटल्य ' ह्या त्याच्या गोत्र नामाचे ' कौटिल्य ' हे बदललेले विकृत रूप आहे. विशाखदत्त नावाचा एक संस्कृत ग्रंथकार होऊन गेला, त्याने ' मुद्राराक्षस ' नावाचे नाटक लिहिले. त्या नाटकात ' कौटिल्यः कुटिलमतिः ' असे चाणक्याला संबोधिले असून कुटिल कारस्थानांचे जनकत्व त्याला बहाल केलेले आहे.

हा ब्राह्मणकुलोत्पन्न होता. बालपणी त्याला उत्तम संस्कार व शिक्षण मिळाले. त्याचे बरेचसे शिक्षण तक्षशिलेतच झाले होते. तक्षशिलेची ख्याती त्या वेळी सर्वत्र झाली होती. अध्ययनानंतर तक्षशीला विद्यापीठातच चाणक्याला आचार्यपद मिळाले. त्याच्या कुशाग्र, तैलबुद्धीमत्तेमुळे त्याची भारतीय विद्वत मंडळात सन्मानाने गणना होऊ लागली.

चाणक्यासंबंधी अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. एक आख्यायिका अशी सांगतात की, एकदा याच्या मुखाकडे पाहून याची आई एकाएकी रडू लागली. तिला रडे आवरेना. तिला अशी रडताना पाहून चाणक्यही चकित झाला. अकस्मात आईला असे रडायला काय कारण घडले, हे त्यालाही कळेनासे झाले. म्हणून त्याने विचारले,

" आई! माझ्याकडे पाहता पाहता तुला असे रडायला काय झाले ? "

आई म्हणाली, " बाळा, तुझे भाग्य फार मोठे आहे. "

" असं ? "

" होय. तू मोठा राजा होशील, बाळ ! "

" मग ही तर आनंदाची, संतोषाची गोष्ट आहे. आई, तू रडतेस कशासाठी ? "

" बाळा, तू राजा झाल्यावर आपल्या आईला—मला—विसरून जाशील,

या भयाने मला रडू कोसळले आहे."

"पण आई, मी राजा होणार हे माझं भाग्य तू कशावरून जाणलंस?"

"बाळा, तुझे पुढचे दोन दात आहेत ना, त्यांनी मला हे सांगितलं." आई म्हणाली. चाणक्याला आपल्या आईच्या दु:खाचे कारण समजले. तो चटकन उठला. बाहेर गेला. एक दगड उचलला आणि आपल्या त्या दोन दातांवर हाणून घेतला. दात पडून गेले. चाणक्य घरात परतला. आईला म्हणाला, "आई ! दु:ख करू नकोस, रडू नकोस. राजलक्षण दर्शविणारे ते दात मी पाडून टाकलेत बघ. आता मी राजा बनणार नाही आणि तुला कधीही विसरणार नाही. तू निश्चिंत राहा, आई ! तुझ्या सुखापुढे मला या जगातली सर्वांत भारी गोष्टही तुच्छ आहे."

चाणक्याचे मातृप्रेम केवढे श्रेष्ठ होते याचा बोध होतो. पण एवढा कोमलहृदयी असणारा चाणक्य तसाच दृढनिश्चयी व क्रोधी होता, हे या दुसऱ्या एका आख्यायिकेवरून दिसते :

एके दिवशी चाणक्य कुठेतरी निघाला होता. वाटेत एक काटेरी गवताचे झाड उगवले होते. चालता चालता चाणक्याच्या पायात एक काटा घुसला. त्याबरोबर पायाला जखम झाली व त्यामुळे वेदनाही होऊ लागल्या. चाणक्याला याचा संताप आला. क्रोधाच्या भरात त्याने शपथ घेतली, "जोंवर ही काटेरी जिवंत झुडुपे नष्ट होणार नाहीत तोंवर स्वस्थ बसणार नाही !"

आणि या संकल्पाबरोबरच लागला की तो पृथ्वी खणायला ! एकेक झुडुप मुळापासून उखडायला त्याने सुरुवात केली !

चाणक्याच्या हातून पुढे जी महान कामगिरी पार पडलेली आहे तिची झलक या कृत्यातही दिसते.

चाणक्य तसा दिसायला अत्यंत काळा, कुरूप, बेंगरूळ होता.

त्या काळी मगधाचे साम्राज्य मोठे होते. मगधाची राजधानी पाटली-

पुत्र म्हणजे आजचे बिहारमधले पाटणा शहर हे वैभवाच्या शिखरावर तळपत होते. नंदवंशातील धनानंद राजा मगधाच्या राजसिंहासनावर होता. तक्षशिलेचे विद्वान साहजिकच पाटलीपुत्राला जाऊन आपल्या विद्वत्तेला राजगौरवाची मान्यता मिळविण्याची आकांक्षा बाळगीत असत. चाणक्याला अशी आकांक्षा नव्हती, पण एक वेगळीच निकड त्याला तत्कालीन परिस्थितीतून जाणवू लागली होती; इतकी की त्यायोगे तो कमालीचा अस्वस्थ बनला होता. तक्षशिलेत असताना तिथली व एकूण भारतातलीच परिस्थिती मोठी चिंताजनक होती. शेकडो लहान लहान राज्ये त्यावेळी होती. आणि ती आपापसात भांडत होती. एकमेकांच्या द्वेष-मत्सराने ग्रासलेली होती. ऐक्याची संभावना नव्हती. स्वार्थाने पोखरलेली होती. त्यामुळे ती दुबळी व आत्मसंरक्षणाच्या दृष्टीनेही असमर्थ होती. या दुबळेपणाचा फायदा घेऊन जर एखाद्या परक्याने हल्ला चढवला तर बघता बघता ही भूमी परक्यांच्या टाचेखाली जाईल व पारतंत्र्य कपाळी येईल याची चिंता चाणक्याला लागून राहिली होती. नाही म्हणायला उत्तरेत मगधातले नंदराज्यच तसे इतरांहून विशाल व प्रबळ असे होते. पण नंदराजांच्या धनलोभामुळे तिथली प्रजाही त्रस्त बनलेली होती. धनानंद राजाने प्रजेवर अनेक जुलमी कर लादले होते. अगणित धन साठविलेले होते. पण प्रजेतील असंतोषाची चाहूल अखेरीस धनानंदालाही लागली असावी किंवा कोणी त्याला तसा सल्ला दिला असावा. त्यामुळे धनानंदाने गुणवंतांना, विद्वानांना दाने द्यावयाला सुरुवात केली होती. त्यासाठी त्याने एक दानशाळाच उघडली होती. या दानशाळेच्या व्यवस्थेसाठी एक समिती नियुक्त करण्यात आली होती व तिच्या अध्यक्षपदी एका विद्वान ब्राह्मणाची नेमणूक व्हावयाची होती. या अध्यक्षाला एक कोटी सुवर्णमुद्रापर्यंत दान करण्याची मुभा होती. चाणक्याला ही संधी उत्तम आहे असे वाटले. कारण एका प्रबळ

सत्तेच्या आधाराशिवाय भारतातली दुबळी, विस्कळित असलेली राज्ये एका भक्कम राज्यव्यवस्थेखाली आणणे शक्य नाही हेही त्याने जाणले होते. एक समर्थ सत्ता उभी करण्याचे स्वप्न चाणक्य मनी बाळगून होता. आणि हा स्वप्न-हेतू घेऊनच तो पाटलीपुत्राला आला.

चाणक्याच्या विद्वत्तेचा व योग्यतेचा प्रभाव थोड्याच काळात धनानंदाच्या मनावर पडला आणि त्याने चाणक्यालाच दानशाळेचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली. चाणक्याने ती तत्काळ मान्य केली व तो पाटलीपुत्रात राहून काम करू लागला. चाणक्य दानशाळेचे काम करीत होताच, पण त्याच्या मनी जो वेगळा हेतू होता, त्या दृष्टीनेही तो कार्यरत होता. मोठ्या चातुर्याने व मुत्सद्देगिरीने त्याने प्रजेच्या व राज्यातील अधिकाऱ्यांच्या अंतरंगात जाऊन चाचपणी केली. त्या वेळी त्याच्या असे नजरेस आले की, धनानंदाच्या राजवटीला सर्वजण विटलेले आहेत. राजाविषयी सुप्त असंतोष सर्वत्र पसरलेला आहे. चाणक्याने या संधीचाही फायदा उठवण्याचा निश्चय केला आणि त्याने त्या असंतुष्टांची हळूहळू जमवाजमव सुरू केली. एक संघटन आकाराला येऊ लागले. चाणक्य त्यांच्या मनात क्रांतीची बीजे पेरू लागला. लवकरच तो सर्वत्र लोकप्रिय झाला. इतका की, त्याच्या लोकप्रियतेची असूया धनानंद राजालाही वाटू लागली. त्याला राग आला. पण सर्वच दृष्टीने श्रेष्ठ असणाऱ्या चाणक्याचे वर्म काढावे तरी कसे? याच विचारात असताना एके दिवशी दरबार भरला असताना चाणक्याला पाहून धनानंदाने भर दरबारात त्याच्या कुरूपतेची चेष्टा केली व म्हटले, "चाणक्या! तुझ्यासारख्या ओंगळ माणसाला माझ्या दरबारात जागा नाही. चालता हो येथून!"

हे भयंकर अपमानकारक शब्द चाणक्याच्या हृदयाला चांगलेच झोंबले. तोही मानी पुरुष होता. ताडकन आपल्या आसनावरून उठला आणि निर्भयपणाने गरजला,

" राजा, प्रजेला नाडून सुखवैभवात लोळणाऱ्या तुझ्यासारख्या भ्रष्ट व कर्तव्यच्युत माणसाच्या गुलामीत मलाही राहाण्याची इच्छा नाही. मी चाललो. पण जाता जाता एक घोर प्रतिज्ञा तुझ्या दरबारात तुझ्यासमोरच उच्चारतो की, नंदकुलाचा निपा:त करून मगधभूमीला तुझ्या जाचातून मुक्त करीन तेव्हाच मी माझ्या शेंडीला गाठ बांधीन ! "

आणि मस्तकावरली शिखा झटक्याने मोकळी करून तो ताडताड विद्युत्‌गतीने निघूनसुद्धा गेला !

" पकडा, पकडा त्याला ! " राजा व अमात्य ओरडले. लगबगीने सगळे धावले. सेवकांनी व सैनिकांनी पाठलाग केला, पण चाणक्य पाऱ्यासारखा निसटला तो निसटलाच !

नंद–निखंदनाची प्रतिज्ञा करून बाहेर पडलेला चाणक्य काही काळ अत्यंत गुप्तपणे पाटलिपुत्र नगरीतच संचार करीत राहिला होता. त्याने मगधातील तरुण उत्साही मनात क्रांतीचे बीज आधीच रुजवून ठेवले होते. आता हवा होता तो भावी क्रांतीचे नेतृत्व करू शकेल असा तेजस्वी तरुण नेता !

चाणक्य अशा तरुणाच्या शोधात शिखा मुक्त सोडून हिंडत होता.

☐

# हवे ते गवसले

पिप्पलीवनात एक मोरिया नामक क्षत्रिय घराणे बौद्ध काळापासून नांदत होते. या घराण्याचा वीर कर्तापुरुष एका लढाईत कामी आला आणि त्याची पत्नी पाटलीपुत्राजवळच्या एका पुष्पपूर नावाच्या खेड्यात भावाबरोबर गुप्तपणाने राहू लागली. त्यावेळी ही स्त्री गरोदर होती. यथावकाश ती प्रसूत झाली व तिला एक पुत्र झाला. पुत्रजन्माचा आनंद मातेला झाल्याशिवाय कसा राहील? पण तो सारा हर्ष, आनंद कठोरपणाने तिने उरी दडपला आणि आपल्या पोटच्या पिलाला तिने एका गोशाळेच्या दाराशी नेऊन ठेवले. कारण बाळाचे कोडकौतुक करण्यापेक्षा त्याला त्या खुनशी राजकीय परिस्थितीतून वाचवणेच महत्त्वाचे होते.

गोशाळेच्या दाराशी ठेवलेले ते गोजिरवाणे बालक एका बैलाच्या दृष्टीस पडले. 'चंद्र' त्या वृषभाचे नाव. त्या चंद्र बैलाने बाळावर छाया धरली. त्याचे रक्षण केले.

थोड्या वेळाने गुराखी आला. त्याला गोशाळेच्या दाराशीच हे अद्भुत दिसले! त्याला नवलही वाटले नि हर्षही वाटला. चंद्राच्या पाठीवरून मायेचा हात फिरवला आणि ते बालक त्या गुराख्याने आपल्या घरी आणले. घरी आणले तर तिथेही बालकाच्या आगमनामुळे कोण आनंद उसळला!

गुराख्याच्या बायकोने झेपावूनच त्याला जवळ हृदयाशी घेतले. आनंदाने वेडावून त्याचे पटापट मुके घेतले. त्या बाळाला कुठे ठेवू नि काय करू असेच तिला झाले! आणि असे होणे स्वाभाविकही होते. कारण तिला दुर्लभ झालेले मातृत्व असे अचानक, एकाएकी लाभले होते! तिने बाळाचे पालनपोषण करून त्याला वाढवले. चंद्र बैलाने त्याला रक्षिले म्हणून त्याचे नाव ‘ चंद्रगुप्त ’ ठेवले.

मोठा झाल्यावर चंद्रगुप्त गुराख्याची गुरं रानावनात चरायला नेऊ लागला. बरोबर इतर गुराख्यांची मुलंही असत. गुरांना चरायला सोडल्या-वर ही मुलं नाना तऱ्हेचे खेळ मांडून बसत.

एके दिवशी अशीच गुरं चरायला सोडल्यावर सोबती चंद्रगुप्ताच्या भोवती जमले. ‘ राजा, राजा ’ खेळायला सुरुवात झाली. खेळातला राजा, अर्थात चंद्रगुप्तच बनला. त्याचे रक्तही राजघराण्यातले होते, आणि तो दिसावयाचाही देखणा, रुबाबदार, राजबिंडा!

खेळ सुरू झाला. चंद्रगुप्त राजाने काही सोबत्यांना त्याच्या छत्रा-खालील लहान, लहान राजे बनविले, काहींना सेनापती, अमात्य केले, तर काहींना अन्य राज्याचे अधिकारी, कारभारी म्हणून ठेवले. काहींना चोर, डाकू केले. राज्य सुरू झाले. चोर–डाकूंनी प्रजेला त्रासले. लुटले. सेवकांनी त्यांना पकडून आणले. राजापुढे उभे केले. राजाच न्यायाधीश बनला. दरबारात कोर्ट सुरू झाले. एका उंच शिळेच्या न्यायासनावर न्यायदानासाठी चंद्रगुप्त बसला. खटला सुरू झाला. आरोपींवर आरोप

ठेवण्यात आला. दोन्ही पक्षातील साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. जाब जबाब झाले न्यायाधिशांची आरोपींच्या अपराधाबद्दल खात्री पटली. त्यांनी गंभीरपणे शिक्षा सुनावली, "आरोपीचा गुन्हा सिद्ध झाला आहे. त्यांच्या अपराधाबद्दल त्यांचे हातपाय तोडा!"

राजाची आज्ञा झाली. पण ती अमलात कशी आणायची? अधिकाऱ्यांच्या जवळ हातपाय तोडायला कुऱ्हाड नव्हती. त्यांनी आपली अडचण राजाला सांगितली. चंद्रगुप्त तत्काळ म्हणाला,

"कुऱ्हाड नसेल तर काठीला बकरीचे शिंग बांधा, कुऱ्हाड तयार करा. पण माझ्या आज्ञेची अंमलबजावणी झालीच पाहिजे!"

हा सारा खेळ चाणक्य आडबाजूला उभे राहून पाहात होता. त्याने या लहानग्या खेळातल्या राजामधला अस्सल राजेपणा जाणला. "बस्स्! असाच तरुण हवा आहे आपल्याला." चाणक्य आनंदाने स्वतःशी पुटपुटला. जे शोधत होता तेच नेमके त्याला गवसले होते.

चाणक्याने गुराख्याची भेट घेतली. एक सहस्र सुवर्ण मोहोरा त्याला दिल्या आणि चंद्रगुप्ताला आपल्याबरोबर घेतले!

चंद्रगुप्ताला घेतले खरे, पण राजकुमार पर्वताचे काय करायचे? कारण तोही चाणक्याच्या आता बरोबर होताच. त्याला राज्याचे आमिष दाखवून फितवल्यामुळेच तर चाणक्याची पाटलीपुत्राच्या राजमहालातून शिरसलामत सुटका झाली होती!

काही दिवस चंद्रगुप्त व पर्वत या दोघांनाही चाणक्याने सांभाळले. नंतर एके दिवशी दोघांच्याही गळ्यात त्याने सुवर्णाचे गोफ घातले. पुढे एके रात्री दोघांनाही एक एक स्वप्न पडले. दुसरे दिवशी सहज बोलताना दोघांनीही आपआपली स्वप्ने चाणक्याला सांगितली; ती ऐकून चाणक्याने मनोमनी ताडले की, पर्वत काही राजा होणार नाही, चंद्र-

गुप्तच होणार ! आणि चाणक्यालाही मनातून हेच हवे होते.

एके दिवशी दुपारी भोजनोत्तर तिघेही एका विशाल वटवृक्षाखाली विश्रांती घेत होते. चाणक्याने पर्वताला बोलावून म्हटले,

"ही तलवार घे आणि आणि चंद्रगुप्ताच्या गळ्यातला सुवर्णाचा गोफ न तोडता किंवा त्याचा फासा न काढता घेऊन ये"

पर्वत गेला. चंद्रगुप्त गाढ निद्राधीन झालेला होता. पर्वताला त्याच्या गळ्यातला गोफ न तोडता किंवा फासा न काढता कसा काढून घ्यायचा ह्याची युक्ति काही सुचली नाही. म्हणून मग तो तसाच हात हलवीत परतला.

पुढे काही दिवसांनी अशाच प्रसंगी चाणक्याने हेच काम चंद्र-गुप्ताला सांगितले. चंद्रगुप्त गेला आणि अन्य कुठल्याच मार्गाने गोफ काढणे शक्य नाही हे पाहून चाणक्यानेच दिलेल्या तलवारीने पर्वताचे शीर त्याने कापले व गोफ घेऊन तो चाणक्याकडे आला. चंद्रगुप्ताच्या ह्या साहसी कृत्यामुळे व आज्ञापालनामुळे चाणक्य फारच खूष झाला. पर्वतकुमारचाही प्रश्न निकालात निघाला होता !

चंद्रगुप्ताच्या प्रारंभिक जीवनाबद्दल अनेक आख्यायिका आहेत. मगधाधिपती नंद याची एक दासी होती. तिचे नाव 'मुरा' असे होते व तिचा हा मुलगा; म्हणून याला मौर्य हे उपनाव मिळाले, अशी हकिकत संस्कृत साहित्यात आहे.

परंतु ह्या दंतकथेवर निरनिराळ्या अस्सल पुराव्यांनी मात केली असून चंद्रगुप्त हा दासीपुत्र नसून तो क्षत्रियच होता असे सिद्ध झालेले आहे.

जैन, बौद्ध व ब्राह्मण साहित्यात चंद्रगुप्ताविषयी बरीच वेगळी व परस्परविरोधी माहिती मिळते.

चंद्रगुप्ताचा वंश मौर्य होता, पण मौर्यांची जात कुठली, याविषयी

मतभेद दिसून येतात. तसेच त्याच्या मूळ स्थानाविषयीही एकवाक्यता नाही. काही विद्वानांचे असे मत आहे की, चंद्रगुप्त हा वायव्य सीमेवरील गांधार देशीचा होता. सिकंदरच्या स्वारीच्या वेळी उल्लेखिलेला शशिगुप्त म्हणजे चंद्रगुप्तच होय. तो स्वात आणि कुनार नद्यांच्या खोऱ्यात राहात असे. 'शशी' आणि 'चंद्र' या एकाच अर्थी शब्दांमुळे हा गोंधळ झालेला आहे असे काहींचे मत, तर ह्या दोन व्यक्ती भिन्न होत्या असे काही विद्वानांचे मत आहे. चंद्रगुप्त व सिकंदर यांची भेट झाली होती, पण त्यावेळी चंद्रगुप्त वयाने लहान होता. तो सिकंदरचा विरोधक होता, तर शशिगुप्त हा प्रौढ आणि सिकंदरचा पाठीराखा होता. शशिगुप्तावर विश्वासून सिकंदरने त्याच्याकडे सिंधू-खोऱ्यातला जिंकलेला प्रदेश सोपविला होता, तर चंद्रगुप्तावर त्याचा इतका रोष होता की, त्याने त्याचा वध करण्याची आज्ञा दिली होती.

एक आख्यायिका अशी आहे की, सर्वार्थसिद्ध नंद राजाला दोन मुले होती. त्यापैकी नवनंद याला राज्य मिळाले आणि दुसरा मौर्य याला सेनाध्यक्षपद मिळाले. मौर्याला शंभर पुत्र होते. हे सर्वजण पराक्रमाने, ज्ञानाने व गुणाने नवनंदापेक्षा कितीतरी सरस होते. त्यांतही चंद्रगुप्त श्रेष्ठ होता. नवनंदाला त्यांच्याविषयी मत्सर वाटत असे आणि आपले राज्य ते घेतील असे भयही वाटत होते. म्हणून नाना कारस्थाने करून नंदाने त्यांना जाळून ठार केले. त्यातून सुटला तो एकटा चंद्रगुप्तच !

चंद्रगुप्ताच्या त्यावेळच्या चातुर्याची एक कथा अशी सांगतात की, सिंहलद्वीपाच्या राजाने एकदा एक पिंजरा नंदाच्या दरबारात धाडला होता. त्या पिंजऱ्यात एक मेणाचा वाघ ठेवलेला होता. पिंजरा न उघडता जो या वाघाला पिंजऱ्याबाहेर काढील तो बुद्धिमान म्हणून घोषित करण्यात येणार होता. त्यानुसार सर्व नंदराजे, अमात्य व दरबारातील अन्य मोठमोठे लोक यांनी बराच खल केला; पण कोणाचीच बुद्धी काम

देईना. अखेरीस चंद्रगुप्त उठला. त्याने एक लोखंडाची सळई घेतली, ती तापविली व तिच्या साहाय्याने पिंजऱ्यातल्या वाघाचे मेण वितळवून त्याला पिंजऱ्याबाहेर काढले !

नंदाच्या तावडीतून निसटल्यावर चंद्रगुप्त तक्षशिलेकडे निघून गेला. तिथे त्याला आचार्य चाणक्य भेटला.

जैन वाङ्मयात चंद्रगुप्त हा सामान्य कुटुंबातला होता व त्याचे बालपण गरीब, मागासलेल्या जमातीमध्ये गेले, असे म्हटले आहे. बौद्ध साहित्यात ही जमात पशूपालक–गुराखी–होती असे म्हटले आहे, तर जैन साहित्यात 'मयूरपोषक' म्हणजे मोर पाळणाऱ्या सरदाराच्या मुलीचा चंद्रगुप्त हा मुलगा होता असा उल्लेख आहे.

बौद्ध कथेप्रमाणेच 'राजा–राजा' खेळायच्या वेळीच चाणक्याने त्याला पाहिले असे जैन कथेत म्हटले आहे, पण ही कथा थोडी वेगळी आहे—

या खेळात चंद्रगुप्त राजा झाला होता. त्याचे रूप, वागणे, बोलणे हे सारे राजासारखेच वाटले म्हणून त्याची परीक्षा पाहावी या हेतूने इतका वेळ आडून खेळ पाहात असलेला चाणक्य पुढे आला आणि खेळातल्या त्या राजापुढे हात जोडून नम्रपणे म्हणाला,

" महाराज ! मी एक गरीब ब्राह्मण आहे. निर्वाहाला साधन नाही. त्यामुळे माझ्या विद्याध्ययनातही खंड उत्पन्न होतो. तरी महाराज, मला काही दान देऊन उपकृत करावे अशी प्रार्थना आहे. "

हे ऐकताच त्या खेळातल्या राजाने अगदी खऱ्याखुऱ्या राजाप्रमाणे आविर्भाव केला व चरणाऱ्या गोधनाकडे निर्देश करून म्हटले,

" विप्र ! हे गोधन आपलेच समजा आणि घेऊन जा ! "

यावर आचार्य चाणक्याने विचारले, " राजन, गोधनाचा स्वामी येऊन मला आडकाठी करू लागला तर—"

पण चाणक्याचे वाक्य पूर्ण व्हायच्या आतच तो बालराजा ताडकन उद्गारला,

“ माझी आज्ञा आहे ती ! माझी आज्ञा कोण भंग करू शकेल ? वीर-भोग्या वसुंधरा ! ”

हे तेजस्वी रूप काही आगळेच होते. चाणक्य थक्क झाला. मनी प्रसन्न पावला. त्याला हवे ते गवसले होते !

दा. 22६९
22/9६/८८

# चाणक्य–नीती

चंद्रगुप्ताला घेऊन चाणक्य निघाला. पुनः एकदा तसाच इतिहास घडत होता. दैत्यांनी गांजलेल्या यज्ञभूमीला सोडविण्यासाठी विश्वामित्रांनी दशरथ राजाकडून श्रीरामाला असेच नेले होते. धनुर्विद्येत निपुण बनवून मातलेल्या राक्षसांचा संहार करविला होता. यज्ञभूमी निःष्कंटक, निर्भय बनविली होती !

चाणक्याने सरळ विन्ध्याचल पर्वत गाठला. तिथे एक रमणीय, पण सुरक्षित स्थळ पाहिले आणि आपली पर्णकुटी उभारली. सकाळ-संध्याकाळ युद्धकलेचे पाठ सुरू झाले. चाणक्य केवळ वेदवेदांगेच पढलेला आचार्य नव्हता, तर धनुर्विद्या, अश्वविद्या इत्यादी विद्यांतही त्याची विलक्षण गती होती. युद्धशास्त्रातले बारकावेही त्याला ज्ञात होते. आचार्याने विन्ध्याचला-तल्या भिल्लांची तरणीताठी पोरे जमवली. त्यांनाही युद्धशास्त्राचे शिक्षण सुरू झाले. बघता बघता एक पलटणच तयार झाली. मग त्यांच्यातल्या

त्यांच्यांत लुटुपुटूच्या लढाया तो घडवून आणू लागला. निरनिराळी अवस्था, निरनिराळे प्रसंग, निरनिराळी संकटे ही कल्पून तो त्यांच्यापुढे मुद्दामच उभी करीत असे; आणि चंद्रगुप्ताच्या शौर्याला, धैर्याला आव्हान देत असे. त्यामुळे युद्धशास्त्राचे सर्वांगीण शिक्षण आपोआपच घडत असे.

पण चंद्रगुप्ताला काही केवळ लढवय्या योद्धा अगर सेनासारंगच बनविण्याची मनीषा चाणक्याच्या मनी नव्हती, तर त्याला त्यांचा राजा-सम्राट–बनवायचे होते!

आणि म्हणूनच आचार्य चाणक्याने चंद्रगुप्तासाठी एक महान ग्रंथ-देखील लिहिला. त्या ग्रंथाचे नाव आहे ' अर्थशास्त्र '. कौटिलीय अर्थशास्त्र म्हणून हा ग्रंथ विख्यात आहे. हा ग्रंथ म्हणजे भारतीय राजनीतीचा आदर्श असून, जगातील प्राचीन राजनैतिक साहित्यात तो अपूर्व गणला जातो. याचे नाव जरी ' अर्थशास्त्र ' असले आणि अर्थशास्त्र म्हणजे जरी संपत्तीचे शास्त्र असे असले तरी चाणक्याच्या अर्थशास्त्रात विपुल अशा विषयांवर सांगोपांग चर्चा केलेली आहे. त्यात पंधरा प्रकरणे असून राज्यव्यवहार-विषयक असे १८० विषय विशद केलेले आहेत. त्यात राजाची कर्तव्ये, त्यांचे मंत्री व सल्लागार यांची कर्तव्ये, मंत्रीमंडळाच्या बैठकी, राज्याची निरनिराळी खाती, व्यापार आणि उद्योगधंदे, शहरांचे व खेडेगावांचे कार-भार, कायदा आणि न्यायालये, सामाजिक रूढी, स्त्रियांचे हक्क, वृद्ध आणि अशक्त यांचे पालनपोषण, लग्न आणि घटस्फोट, करांची आकारणी, सैन्य आणि आरमार, युद्ध आणि तह, राजकारणी मुत्सद्यांचे डावपेच व कर्तव्ये, शेती, सूत काढणे आणि कापड विणणे, कारागीर लोक, प्रवासाचे परवाने, तुरुंग आदी विविध विषय चाणक्याने या ग्रंथात समर्थपणे विवेचिलेले आहेत. पं. जवाहरलाल नेहरूंनी या ग्रंथाच्या अंतरंगाची माहिती आपली कन्या प्रियदर्शिनी इंदिरा हिला करून देताना लिहिले आहे—

' या ग्रंथावरून असे दिसते की, राज्यारोहणाच्या वेळी राजाला राज्या-

धिकार लोकांच्या हातून मिळत असे. त्या अधिकाराचा स्वीकार करताना राजाला लोकांची सेवा करण्याबद्दल प्रतिज्ञा करावी लागे की, ' मी जर तुमच्यावर जुलूम केला, तर मला स्वर्गप्राप्ती न होवो आणि माझा संसार व माझी संपत्ती यांचा नाश होवो. '

या ग्रंथात राजाचा रोजचा व्यवहार व दिनचर्या यांबद्दलची माहिती आढळते. तातडीच्या कामासाठी वाटेल त्यावेळी त्याने तयार असले पाहिजे. त्याच्या मर्जीस येईल तोपर्यंत कामाचा खोळंबा व्हायचा, किंवा काम होणे न होणे हे त्याच्या लहरीवर अवलंबून राहायचे हे चालत नसे.

राजाची वृत्ती कशी असावी हे सांगताना चाणक्य म्हणतो—

प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम् ।
नात्मप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हितम् ।।

—प्रजेच्या सुखात राजाचे सुख असते आणि प्रजेच्या हितात राजाचे हित असते. राजाचे हित स्वार्थसाधनात नसते, तर ते प्रजेला संतुष्ट ठेवण्यात असते.

' आर्य कधीही गुलामगिरी पत्करणार नाही '—' न त्वेवाऽऽर्यस्य दासभावः '–या प्राचीन तत्त्वाचा पुरस्कार चाणक्याच्या अर्थशास्त्रातही आहे.

चाणक्याने केलेले नियमही मोठे कौतुकास्पद होते. जो कोणी रस्त्यात चिखल अथवा पाणी साचू देईल त्यालाही शिक्षा असे.

अशा आचार्यांच्या हाताखाली चंद्रगुप्ताचे शिक्षण झाले. तथापि, योग्य असा तरुण हातांशी आला, त्याने मन लावून सगळी शिकवणूक आत्मसात केली व आपली योग्यता सिद्ध केली तरी एवढ्याने चाणक्याच्या उरातले स्वप्न साकार होणार नव्हते. प्रबळ अशा नंद साम्राज्याच्या निखंदनासाठी चंद्रगुप्ताच्या हाताशी तेवढीच प्रबळ अशी सेना आवश्यक होती. अशा सेनेच्या अभावी नंद साम्राज्याचा शेवट करणे अशक्य होते. आणि ही वस्तुस्थिती आचार्य चाणक्य जाणून होता. म्हणून त्याने त्या

दृष्टीनेही प्रयत्न सुरू ठेवलेले होते.

सेना उभी करायची म्हणजे द्रव्यबळ हवे होते. 'सैन्य पोटावर चालते' हे देखील चाणक्य ओळखूनच होता. म्हणून त्याने धन-संचयालाही सुरुवात केली होती. त्यासाठी त्याने मुद्दाम धातुशास्त्राचा अभ्यास केला होता व या ज्ञानाच्या जोरावर त्याने एका कार्षापणाचे आठ कार्षापण बनविले होते. कार्षापण हे तत्कालीन नाणे होते. आणि अशा प्रकारे ऐंशी कोटी कार्षापण त्याने जमा केले होते. या धनाच्या बळावर मग त्याने चोहोकडून सैन्याची जमवाजमव केली व त्या सैन्यासही चांगले शिकवून तयार करून ते चंद्रगुप्ताच्या ताब्यात दिले. या सैन्यात विविध प्रदेशातले लढाऊ, आयुधजीवी, शूर योद्धे होते.

चंद्रगुप्त या वेळेची वाटत पाहात होता. कारण त्याचेही मन स्वातंत्र्य-भावनेने भारावून गेलेले होते. तक्षशिलेच्या आंभीचे देशद्रोही कृत्य, पुरुचा पाडाव, अभिसार राजाची शरणागती अशा घटना सिकंदरच्या स्वारीपासून तो पाहत-ऐकत आला होता आणि त्याचे बाहू परक्यांना मायभूमीवरून हुसकून लावण्यासाठी स्फुरण पावत होते. चंद्रगुप्ताने अगदी तरुण वयातच सिकंदरची भेट घेतली होती, असाही उल्लेख जस्टिन नावाचा इतिहासकार करतो. चाणक्याच्या हाताखाली शिक्षण घेऊन तयार झालेल्या चंद्रगुप्ताने साम्राज्यस्थापनेची आकांक्षा मनी धरली नसल्यासच नवल! चाणक्याचे स्वप्न हे चंद्रगुप्ताचेही ध्येय-स्वप्न बनले होते. एक प्रबळ साम्राज्य स्थापन करावयाचे तर मगधाचे भ्रष्ट राज्य नष्ट करून ते हाती घेण्यानेच हे शक्य होईल असे त्यालाही पटलेले होते. आणि या संदर्भातच त्याने सिकंदरची भेट घेतलेली होती.

सिकंदर त्यावेळी पंजाब व पर्वतीय राज्ये जिंकून व्यास नदीपर्यंत येऊन ठेपलेला होता, व मगध-स्वारीचे बेत करीत होता. एके दिवशी हा तरुण चंद्रगुप्त सिकंदरपुढे मोठ्या सम्राटाच्या ताठ्यानेच गेला. जाताना

त्याने इतर राजांप्रमाणे मोठा नजराणाही नेला नव्हता की कसली लाचारीही पत्करलेली नव्हती.

सिकंदरला तो म्हणाला, " मगधात धनानंद राजाची जुलमी व भ्रष्ट राजवट नांदते आहे. प्रजेत अत्यंत असंतोष धुमसतो आहे. अशा राजाला राज्यावरून हुसकून लावण्याची माझी इच्छा आहे. या कामी आपण मला साहाय्य केलं तर मीही तुम्हांला साहाय्य करीन ! "

सिकंदरच्या मनी हेच विचार चालले होते. त्याने विचारले, " तरुणा, तू कोण आहेस ? कुठून येतो आहेस ? "

चंद्रगुप्ताने सांगितले, " मी मगधपुत्र आहे. मगधराज आहे. चंद्रगुप्त म्हणतात मला. "

" असं ! तर मग तू आमचा क्षत्रप हो. आमचे मांडलिकत्व कबूल कर. तर आम्ही तुला साहाय्य करू. "

हे ऐकताच चंद्रगुप्त उसळून ताडकन म्हणाला, " ते शक्य नाही, सिकंदर ! मी सम्राट होण्यासाठी जन्माला आलो आहे. हा भारत देश माझा आहे. मी तुमच्याशी बरोबरीच्या, मैत्रीच्या नात्याने वागू इच्छितो. पुढे कधी आलात तर एक मित्र म्हणून मी तुमचे स्वागत करीन. तुमचे मांडलिकत्व कबूल नाही करणार ! "

हे बाणेदार शब्द ऐकून सिकंदरही चमकला. आजवर मिळवलेला विजय त्याला एकदम डळमळल्यासारखा वाटला. तरी तो हसून म्हणाला,

" जा, जा तरुणा ! भलत्याच धुंदीत राहू नकोस. "

" सिकंदर, मी जातो. पण हे ऐकवून जातो की, या देशाची तसूभरही भूमी यापुढे आपल्यासारख्या परक्याच्या जोखडाखाली राहाणार नाही ! ती माझ्या अमलाखाली येईल. स्वतंत्र होईल ! "

चंद्रगुप्त कडाडला आणि विजेच्या गतीनेच तिथून निसटला.

" अरे, पकडा, पकडा त्याला. "

सिकंदर ओरडला, पण चंद्रगुप्त कोणाच्याच हाती लागला नाही. सिकंदरलाही पुढे जाता आले नाहीं, त्याला सेनेच्या मर्जीनुसार माय-देशी परतावे लागले.

चंद्रगुप्ताने हा एक प्रयत्न करून पाहिला होता, पण तो जमला नाही. तेव्हा त्याने चाणक्याने तयार केलेल्या सैन्याच्या बळावर स्वतःच मगधावर स्वारी करायची असा विचार केला आणि चाणक्याच्या सल्ल्यानेच चंद्रगुप्ताने पाटलीपुत्र नगरीला चोहोबाजूंनी वेढले. परंतु त्या बाहेरील राज्यातील अन्य शहरे, खेडी यांमधून लोक चंद्रगुप्ताच्या सेनेविरुद्ध उभे राहिले. पाटलीपुत्रातही नंदाची विशाल सेना होती. तिच्यापुढे चंद्रगुप्ताचा टिकाव लागला नाही. आतून व बाहेरून अशा कोंडीत त्याचे सैन्य सापडले व कित्येक सैनिक ठार झाले. चंद्रगुप्त व चाणक्य यांनाही जीव वाचविण्यासाठी पळ काढावा लागला. हे दोघे हाती लागले नाहीत, तेव्हा धनानंदाने त्यांना पकडण्यासाठी चपळगती घोडेस्वार त्यांच्या पाठलागावर सोडले. हे संकट चुकविण्यासाठी चाणक्याने लगबगीने साधुवेष धारण केला व एका तलावाच्या काठी बसला. तेवढ्यात एक घोडेस्वार तिथे येऊन पोचला व चंद्रगुप्ताबद्दल विचारू लागला. त्याच वेळी चाणक्याने चंद्रगुप्ताला तलावात बुडी घेण्यास सांगितले होते; त्याप्रमाणे चंद्रगुप्ताने बुडी घेतली. साधू चाणक्याने तिकडे बोट करून घोडेस्वाराला चंद्र-गुप्ताचा ठावठिकाणा सांगितला. त्याबरोबर घोडेस्वार खाली उतरला, आपली शस्त्रे ठेवली व त्याने तलावात उडी घेतली. चाणक्याने त्याची तलवार उचलली आणि त्याचाच वध केला. पाठोपाठ दुसराही एक घोडेस्वार येऊन ठेपला. चाणक्याने त्याच तलवारीने त्यालाही ठार केले.

तलावाच्या बाजूलाच एक धोबी कपडे धूत होता, त्याच्याजवळ जाऊन ‘ राजा धोबी जातीच्या विरुद्ध आहे. मारेकरी धाडले आहेत ’ असे सांगून त्याला घाबरवून सोडले. धोबी काम टाकून तसाच पळाला.

चाणक्य व चंद्रगुप्त धोब्याचे सोंग करून कपडे बडवीत राहिले. अशा रीतीने प्राणावरचे संकट त्यावेळी त्यांनी टाळले.

पहिल्याच चढाईत अपयश पदरात आले आणि ते दोघे परत एका जंगलात आश्रयाला गेले. जंगलात आल्यावर त्यांना थोडा निर्धास्तपणा लाभला. त्यांचे आतापर्यंतचे प्रयत्न व्यर्थ ठरले होते व सैन्याची वाताहत झाली होती.

पुढे त्यांनी लोकभावना जाणून घेण्याच्या उद्देशाने वेष पालटून निरनिराळ्या भागात हिंडायला सुरुवात केली. असेच एकदा एका खेड्यातून जात असता रात्रीचे वेळी एका घरात चाललेला मायलेकरांचा संवाद त्यांच्या कानावर आला :

घरात आई आपल्या मुलाला जेवायला वाढत होती. मुलगा पानातल्या भाकरीची कड तशीच ठेवून तिचा मधलाच भाग तोडून खात होता. मुलाचे हे खाणे पाहून आई त्याला म्हणाली,

" त्या चंद्रगुप्तासारखंच तू करत आहेस का रे, बाबा ! "

" काय म्हणतेस, आई ? " मुलानं काही न कळल्यावरून विचारले. बाहेर आपलं नाव कानावर आल्यामुळे वेष बदललेला चंद्रगुप्त व चाणक्य कान टवकारून ऐकू लागले.

आई सांगत होती, " मी म्हणाले, त्या चंद्रगुप्तानं जशी चूक केली तशीच तू करत आहेस ! "

" कशात चुकला तो, आई ? "

" अरे, त्याला राज्य मिळवायचं होतं ना ? "

" हो. मग चूक कशी झाली त्याच्याकडून ? " मुलगाही जिज्ञासू असावा. आई सांगू लागली, " अरे, राज्य मिळवायचं तर आधी आजूबाजूचे प्रदेश ताब्यात घ्यायला हवे होते. ते सोडून आतील मध्यावरच त्याने आक्रमण केले ! "

चंद्रगुप्त आणि चाणक्य यांना झटकन आपली चूक लक्षात आली. पाटलीपुत्रावर हल्ला करण्याच्या अगोदर सीमेवर ताबा मिळवायला हवा होता, तिकडे दुर्लक्ष केले, त्यामुळेच चंद्रगुप्ताची कोंडी झाली, ही चूक खरीच !

चूक लक्षात आल्यावर ती दुरुस्त करून पुनश्च आक्रमणाच्या योजना आखायला त्यांनी सुरुवात केली. पुनश्च त्यांनी सैन्याची जमवाजमव केली. यावेळपावेतो सिकंदर भारताबाहेर गेला होता, पण त्याचे अधिकारी जागोजागी होतेच.

चाणक्याने साम-दाम–दंड–भेद ही राजनीतीची अस्त्रे बाहेर काढली. प्रत्यक्ष आक्रमणाच्या आधी त्याने निरनिराळ्या देशांना भेटी दिल्या. हिमवत्कूट नावाच्या देशी जाऊन त्याने तेथील पर्वतक राजाची भेट घेतली. त्याच्याशी मैत्रीचा तह केला. चंद्रगुप्ताला त्याने अभिसार राजाकडे धाडले आणि सांगितले, " चंद्रगुप्ता, अभिसारनरेशाची आकांक्षा सप्तसिंधु प्रदेश मुक्त करण्याची आहे असे कळते. ती खरीच असेल तर आपण या संधीचा लाभ उठवला पाहिजे, आणि नसेल तर अशी आकांक्षा त्याच्यात निर्माण करूनही लाभ साधला पाहिजे. "

तक्षशिलेतही वातावरण बदलून टाकण्याच्या हेतूने चाणक्याने विद्याधामात एका सांस्कृतिक उत्सवाची योजना केली. देशोदेशीच्या राजांना निमंत्रणे गेली. उत्सवाची तयारी धूमधडाक्याने सुरू झाली.


चंद्रगुप्ताच्या व चाणक्याच्या दौऱ्याने वातावरण बदलू लागले होते. परकी सत्ता मांडलिकांनाही आता बोचू लागली होती. सर्वांना आवाहन करून एका केन्द्र सत्तेखाली आणण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. आचार्य चाणक्यांची योजना पक्की होती. जे या योजनेला सहकार्य देतील ते आपले, आणि जे विरोध करतील ते आपले नव्हेत—एवढेच नाही तर प्रसंगी इथलेही राहाणार नाहीत, अशी आचार्यांची विचारसरणी होती.

मात्र यासाठी आधी संबंधितांशी सर्व सभ्य सामोपचार, समझौता, सौजन्य-पूर्वक विनंती आदी मार्ग चोखाळले जातील आणि मगच कठोर उपायांचा अवलंब केला जाईल अशी चाणक्यनीती होती.

उत्सवाची तयारी पूर्ण झाली, तशी देशोदेशीचे राजे-महाराजे तक्षशिलेत जमा झाले. उत्सव यथासांग झाला, पण ते केवळ निमित्तच होते. आचार्य चाणक्यांनी सर्व राजांना जमवून एकछत्री साम्राज्यस्थापनेसाठी आवाहन केले. पण त्या सर्वांनाच एकमेकांबद्दल असूया, द्वेष, मत्सर ह्या नीच भावना वसत असल्यामुळे नेतृत्व कोणी करायचे यावरच एकमत होईनासे झाले. ही स्थिती शोचनीय होती, पण चाणक्याला हीच यावेळी अनुकूल वाटली. या त्यांच्या आपापसातील भांडणांचा लाभ उठवून चाणक्याने मोठ्या कौशल्याने चंद्रगुप्ताचे नाव पुढे केले. सर्वांनाच ते पसंत पडले. कारण नेतृत्व घेण्यासाठी पुढे आलो आणि परत फिरलेला सिकंदर परतला तर? किंवा त्याच्या इथल्या प्रतिनिधींनी आणखी काही संकटे निर्माण केली तर?—अशी भीती प्रत्येकाच्या मनी होतीच. म्हणून त्यांना नेतृत्वाचा मोठेपणा हवा होता, आणि नकोही होता!

चाणक्याने ही त्यांची मनःस्थिती चांगलीच जाणली होती व म्हणूनच त्याने आपले प्यादे चंद्रगुप्ताच्या रूपाने पुढे सरकवले आणि डाव जिंकला!

□



# नंद—निखंदन

सीमेवरच्या राज्यांचा अशा प्रकारे बंदोबस्त झाल्यावर सभोवतालची राज्ये चंद्रगुप्ताने जिंकून घेतली व मग पाटलीपुत्राकडे आपला मोर्चा वळवला. जाता जाता लागतील ती शहरे, गावे तो जिंकीतच चालला होता. परंतु याहीवेळी एका शहरात त्यांना पुढे जाता येईना. प्रखर विरोध होऊ लागला. शहराभोवती सैन्याचा वेढा देऊन बसावे लागले. कित्येक दिवस झाले तरी यशाचे चिन्ह काही दिसेना. इतिहासाची पुनरावृत्ती होते की काय, अशी भीती निर्माण झाली, तेव्हा चाणक्याने युक्तीने काम साधावयाचे असे ठरविले व त्याने साधूचा वेष घेऊन शहरात प्रवेश मिळविला. शहरातले लोकही या वेढ्याने गांजलेले होते. त्रासलेले होते. साधूला पाहाताच ते त्याच्याभोवती जमा झाले व हे युद्ध केव्हा संपणार? हे संकट कसे दूर होईल? असे प्रश्न विचारू लागले. त्यावर, शहरात जाताना. चाणक्याने सप्तमातृकांचे जे स्थान पाहिले होते, त्याचाच उल्लेख

करून त्यांना सांगितले की, ' जोवर या मंदिरात सात देवी आहेत आणि त्या शहराचे रक्षण करीत आहेत तोंवर वेढा उठणे शक्य नाही. ' हे ऐकताच त्रासलेल्या गावकऱ्यांनी देवींच्या मूर्ती तेथून हलविल्या. हे पाहून चाणक्याने संकेत खूण केल्यावर, चंद्रगुप्ताने आपली सेना शहरापासून माघारी घेतली व थोड्याच अंतरावर जाऊन थांबविली. शहरातील लोकांना याचा अतिशय आनंद झाला. त्यांनी त्या भरात उत्सवच सुरू केला, व ते सर्वजण संकट टळले या भावनेने हर्ष-आनंदात दंग होऊन गेले. या संधीचा फायदा घेऊन चंद्रगुप्ताने त्या बेसावध नागरिकांवर हल्ला चढवला आणि ते शहर जिंकून घेतले. हा एवढा एक मोठा अडथळा दूर झाल्यावर पाटलीपुत्रावरच चंद्रगुप्ताने धडक मारली. सारे शहर वेढले. नंद-साम्राज्य तर जिंकून घेतले होतेच. आता फक्त मगधची राजधानीच राहिली होती. तुंबळ युद्ध झाले आणि अखेरीस धनानंद राजा मारला गेला. नंदवंश निखंदनाची चाणक्याची प्रतिज्ञा साकार झाली !

जैन ग्रंथात मात्र धनानंद शरण आल्यावर चाणक्याने त्याला जीवदान दिले आणि त्याला एका रथात राहतील तेवढ्याच वस्तू बरोबर घेऊन राज्य सोडून जाण्यास सांगितले असा उल्लेख आहे; पण तो चाणक्याच्या प्रतिज्ञेच्या विरोधी असल्याने असत्य मानला जातो.

सारे मगध साम्राज्य चंद्रगुप्ताने जिंकून घेतले. नंदवंशाची अखेर झाली. पण या युद्धातही अमाप हानी झाली होती. ' मिलिंदपन्हो ' नावाच्या बौद्ध ग्रंथात या युद्धाच्या भीषणतेची माहिती दिलेली आहे. या ग्रंथातील वर्णनावरून हे युद्ध केवळ राजकीय डावपेचांचे नव्हते, तर दोन महान प्रबळ सेनांतील होते. नंदाचे सेनाधिपत्य भद्दसाल नामक रणधुरंधर सेनापतीने केले होते. या युद्धामध्ये १०० कोटी सैनिक, १० हजार हत्ती, १ लाख अश्व व ५ हजार सारथी कामास आले, असा उल्लेख मिलिंदपन्हो ग्रंथात केलेला आहे. अर्थात ही आकडेवारी

बरीच अतिरंजित, अतिशयोक्त आहे हे उघडच दिसत आहे. परंतु या वरून हा संघर्ष भयंकरच झाला असला पाहिजे व मोठ्या प्रमाणावरील हत्याकांडानंतरच राज्यक्रांती घडून आली. नंदराजाचे सैन्यबळही काही कमी नव्हते. ग्रीक लेखकांनी त्या सैन्याची तपशीलवार माहिती दिलेली आहे. सिकंदरला भारतामधील त्याचे आक्रमण अधिक व्यापक न करण्यात जी कारणे झाली त्यांपैकी नंदाचे बलाढ्य सैन्यसामर्थ्य हे देखील एक कारण होते. अशा सामर्थ्यशाली सेनेशी टक्कर देताना भयंकर संहार होणे अपरिहार्य, अटळ होते. पण चंद्रगुप्ताने तशा सामर्थ्याशी झुंज घेऊन विजय मिळविला ही खरोखरच त्याच्या शौर्याची परमावधी आहे. चाणक्याच्या बुद्धिमत्तेचे सादर कौतुक आहे !

नंद राज्याचा शेवट झाला खरा, पण त्याबरोबर चाणक्य व चंद्रगुप्त यांच्या मार्गातील अडीअडचणींचा वा संकटांचाही शेवट झाला, असे मात्र नाही. उलट ती वाढली. कारण नंद राजघराण्यावर भक्तिपूर्वक प्रेम करणारेही काही होते. नंदराजाचे हितचिंतक, नंद घराण्याचे स्वाभिमानी असे काही लोक होतेच. त्यांना मगध सिंहासनावरून नंदाची हकालपट्टी अत्यंत दुःखदायक वाटणे स्वाभाविक होते. त्यांच्या श्रद्धेला, भावनेला धक्का बसला होता व त्याचमुळे मगधाच्या सिंहासनाला अन्य कुणाचाही स्पर्श घडू नये अशी त्यांची त्या विपन्नावस्थेतही धडपड चालू होती. त्यांत अग्रगण्य होता नंदाचा 'महाअमात्य राक्षस.' त्याचे मूळ नाव होते 'कात्यायन.' हा महान मुत्सद्दी, चतुर, साहसी, शुद्धाचरणी व प्रखर राज्यनिष्ठ होता. त्याच्या गुणांविषयी प्रजेच्या मनीमानसी आदरभावना वसत होती. नंदराजाबद्दल त्यांना तिटकारा होता, पण अमात्य राक्षसा-बद्दल आदर होता. नंदविच्छेद झाला आणि तेव्हापासून राक्षसही गुप्त झाला. त्याचा चाणक्याने कसून शोध घेतला, अनेक हेर धाडले, अनेक

युक्त्या रचल्या, पण राक्षसही तसाच तोडीस तोड होता. त्याने आपला थांगपत्ता लागू दिला नाही आणि केवळ लपून स्वस्थही बसला नाही. नंद-सिंहासनावर नंद घराण्यातील व्यक्तीच आणण्याच्या दृष्टीने तो प्रयत्नशील होता. आणि याची कल्पना चाणक्याला पूर्णपणाने होती. चंद्रगुप्ताचे राज्य निर्विघ्न व्हावे, सुरक्षित राहावे याचीच काळजी त्याला आता लागून राहिलेली होती. राक्षसाला आपल्या बाजूला कसे वळविता येईल, याच्या तो खटपटीत होता. राक्षसाची योग्यता तो जागून होता व चंद्रगुप्ताच्या सिंहासनालाही त्याची राज्यनिष्ठा लाभावी, त्यानेच मगधाचे महाअमात्यपदही पुनश्च समर्थपणाने विभूषित करावे, अशी त्याची इच्छा होती. आणि त्याना असेही वाटत होते की जर राक्षसाने ही धुरा आपल्या खांद्यावर घेतली तर आपण निर्धास्त होऊन परत तक्षशिला-विद्याधामात जाऊ. परत अध्ययन-अध्यापनाच्या पवित्र कामात दंग होऊ. चंद्रगुप्तासारखे देशाचे नेतृत्व करणारे स्वातंत्र्यवीर तरुण तयार करू !

परंतु नंद पाडावानंतरच्या काही काळात तरी हे घडू शकले नाही. चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळात राजकीय अव्यवस्थाच निर्माण झाली होती. या यादवीला नंद राजाचे हितचिंतकच प्रोत्साहन देत होते. पण ही अराजकता नष्ट करण्यासाठी चाणक्याने सत्वरच निरनिराळे मार्ग अवलंबिण्यास सुरुवात केली.

एकदा चाणक्याच्या दृष्टीस एक दृश्य पडले. एका विणकराच्यां घरात अतोनात ढेकूण झाले होते व त्याच्या घरची सारी मंडळी ढेकणांच्या त्रासाने त्रस्त झाली होती. तेव्हा त्या त्रासातून वाचण्यासाठी व ढेकणांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी विणकर ढेकणांचा आगर बनलेला तो भागच जाळून टाकीत होता. चाणक्याला विणकराची जालीम व्यवहार-दक्षता फारच पसंत पडली. तो प्रभावित झाला आणि त्याने त्या विणकराला नगराध्यक्ष बनवून टाकले. या विणकराने नंतर नगरीतली

यादवी मोडण्याचे तंत्र सुरू केले. त्याने नंदराजाच्या पाठीराख्यांना, हितचिंतकांना, उपद्रव्यांना निरनिराळ्या तऱ्हेच्या भेटी पाठविण्यास सुरुवात केली. त्यायोगे त्यांच्या मनातील संशय दूर केला आणि नंतर कठोर निश्चय करून त्यांची कत्तल घडवून आणली.

राक्षसाचे वेगळेच कारस्थान चालले होते. नंदराजाच्या मृत्यूनंतर त्याचा बंधू सर्वार्थसिद्ध यालाच राक्षसाने मगधाधिपती मानले. चाणक्याचे या कारवायांकडे बारीक लक्ष होते. त्याने काही तरी युक्तिप्रयुक्तीने सर्वार्थसिद्धाच्या मनात राक्षसाविषयी विरोध निर्माण केला. राक्षस आणि चाणक्य या दोघांच्या कारस्थानात आपला फुकट बळी जाईल, अशी भीती त्याला बसली आणि त्याने सर्वत्याग करून संन्यास घेतला. राना-वनात निघून गेला. चाणक्याने पुन: कधी या संन्याशाने डोके वर काढू नये म्हणून तिकडेच त्याची हत्या करविली.

राक्षसाचे हे पहिले कारस्थान फसल्यावर त्याने पर्वतक राजाला, मगधाचे राज्य देण्याचे आमिष दाखवून फितविले. चाणक्याला ही वार्ता त्याच्या हेराकडून कळली, तेव्हा पर्वतकाचा काटा दूर करण्याच्या विचारात तो गढला. तेवढ्यात राक्षसाने आणखी एक महाभयंकर उपाय योजून चंद्रगुप्तालाच ठार करण्याचा घाट घातला होता. राक्षसाजवळ एक जालीम ‘ विषकन्या ’ होती. हिचा प्रयोग चंद्रगुप्ताच्या बाबतीत करण्याचे राक्षसाने ठरवले. चाणक्याला या प्रयोगाचा कधी तरी वापर राक्षस करणारच याची कल्पना होतीच. कारण अशी विषकन्या त्याच्या-जवळ आहे हे चाणक्याला ठाऊक होते, म्हणून तो दक्षही होता.

राक्षसाचे हे कारस्थान कळल्यावर या विषकन्येचा प्रयोग पर्वतकावरच घडवून आणण्याचा विलक्षण बेमालूम घाट चाणक्याने रचला आणि तो यशस्वी रीत्या सिद्धीसही नेला. पर्वतकाचा काटा अशा रीतीने दूर झाला.

पर्वतकाला ठार केल्यावर त्याचा पुत्र मलयकेतू याला राक्षसाने सूडाच्या भावनेने पेटविले व आपलेसे केले. त्याला मगधाचे राज्य देण्याचा निश्चय केला. आणि त्याच्या साहाय्याने पाटलीपुत्रावर आक्रमण करण्यासाठी म्हणून सैन्याची जमवाजमवही सुरू केली.

चाणक्याला त्याच्या हेरांनी या सर्व बित्तंबातम्या तत्काळ पुरविल्या. त्याचे हेर सर्वत्र दूरवर जसे पेरलेले होते, तसेच राक्षस व मलयकेतू यांच्या खास गुप्त दालनातही वावरत होते. त्यामुळेच राक्षसाच्या कारस्थानांची दिशा चाणक्याला फार आधीच कळत असे आणि चाणक्याला ती कारस्थाने हाणून पाडणे सहज-सुलभ जात असे.

राक्षसाने मलयकेतूला फितविले, तर चाणक्याने पर्वतकाच्या भावाला—वैरोचक याला—वश केले. त्याला अर्धे राज्य देण्याचा बहाणा करून एका शुभ मुहूर्तावर नगरप्रवेश करण्याची योजना आखली.

राक्षसाला हे कळताच त्याने त्याच वेळी चंद्रगुप्ताला नगराची वेस कोसळवून ठार करण्याची योजना केली. ही वार्ताही चाणक्याला कळली होती. म्हणून त्याने नगरप्रवेशाच्या वेळी मिरवणुकीत चंद्रगुप्ताच्या जागी वैरोचकाला बसविले. त्यामुळे वेस अंगावर कोसळून वैरोचक ठार झाला व चंद्रगुप्त सुखरूप राहिला.

अशी आपली कारस्थाने फसत होती, तरी राक्षसाची जिद्द मोठीच होती. त्याने एका विश्वासू वैद्यामार्फत चंद्रगुप्ताला विषबाधा होईल व तो मृत्यूमुखी पडेल असे कारस्थान शिजवले, पण चाणक्याने हेही ओळखून त्याच विषाने त्या वैद्याचीच हत्त्या घडवून आणली.

राक्षसाने आपल्या हेरांमार्फत चंद्रगुप्ताचा राजमहाल सुरुंगाने उडवून लावण्याचा कट रचला होता, पण सदैव सावध असलेल्या चाणक्याने तोही पार उधळून लावला. हाती आलेल्या कटवाल्यांची कत्तल केली.

चाणक्याला आता मलयकेतूलाही वश करायचे होते, म्हणून त्याने

ही कामगिरी आपला अत्यंत विश्वासू सेवक भागूरायण याजवर सोपविली. भागूरायण हा महा हुषार मनुष्य होता. त्याने हळूहळू मलयकेतूशी संधान जुळविले व लवकरच त्याला आपल्या कह्यात घेतले. मग त्याला असे पटवून दिले की, त्याच्या बापाला—पर्वतकाला—राक्षसानेच दुसऱ्याच्या हातून ठार केले आहे. त्याची खात्री पटावी म्हणून चाणक्याने चंद्रगुप्ताला एक बनावट पत्र धाडले, त्यावर राक्षसाची मुद्राही उठविली. पत्र नेणारा सरळ मलयकेतूलाच भेटेल अशी व्यवस्था केली. आणि ते पत्र जेव्हा मलय-केतूच्या हाती पडले तेव्हा त्याची अशी खात्री पटली की, राक्षस हा चंद्रगुप्ताच्याच बाजूचा माणूस आहे व तो इतर पाच राजांना साथीला घेऊन मलयकेतूला ठार मारण्याच्या प्रयत्नात आहे.

अशी खात्री पटताच मलयकेतूने राक्षसाकडे तर पाठ फिरवलीच, पण त्या पाच राजांचाही त्याने वध केला.

चाणक्य अशा हिकमती लढवून चंद्रगुप्ताच्या मार्गातील एकेक शत्रू हस्ते परहस्ते दूर करीत होता.

याच प्रयत्नातला एक प्रयत्न म्हणून चाणक्याने चंदनदास रत्न-पारख्याला कारावासात ठेवले होते. हा चंदनदास चांगला रत्नपारखी तर होताच, पण अमात्य राक्षसाचा परममित्र होता. त्याच्या कारावासाने राक्षसाचा पत्ता कळेल, अशी चाणक्याची अटकळ होती.

राक्षसाला आपण केलेले सर्वच्या सर्व प्रयत्न फसल्याचे पाहून मनस्वी दु:ख झाले. वैफल्याने त्याचे मन ग्रासून गेले. त्याला या अवस्थेत, कलिंगाशी संधान बांधून मगधावर चढाई करायला उद्युक्त करायचे किंवा स्वत: चाणक्याच्या स्वाधीन व्हायचे, असे दोनच पर्याय सुचत होते. पहिला मार्ग असाच पुन्हा फसणारा होता आणि दुसरा मार्ग मित्रकर्तव्या-साठीदेखील करायला हवा असा होता. चंदनदास आपल्यासाठी कारावासात आहे, त्याला उद्या चाणक्य ठारही करील अशी भीती राक्षसाला होतीच.

राक्षसाचे मन दोलायमान झाले होते. तो अतिशय अस्वस्थ बनला होता. तेवढ्यात ती अपेक्षित, पण भयंकर वार्ता कानी आली—चाणक्याने चंदनदासाला वधस्तंभावर चढवायचे ठरवले होते. ही वार्ता ऐकून राक्षसाने तत्काळ निर्णय केला, चंदनदासाला आपल्यासाठी मरू द्यायचे नाही !

चंदनदासाला वधस्तंभावर चढविण्याच्यावेळी राक्षस निर्भयपणाने तेथे प्रकट झाला. सेवकांनी त्याला पकडले, पण आदराने त्याला शिबिकेतून राजमहालात नेले. चंदनदासाचीही सुटका झाली.


राजमहालात चंद्रगुप्त आणि चाणक्य यांनीही मोठ्या आदरपूर्वक राक्षसाचे स्वागत केले !

चाणक्याने आपले भव्य स्वप्न राक्षसाला निवेदन केले, आणि चंद्रगुप्ताच्या मगध साम्राज्याचे महाअमात्यपद स्वीकारण्याची प्रार्थना केली.

राक्षसाचेही मन आता बदलले होते. तो निःशंक बनला होता. त्याने चाणक्याची विनंती मानली. चाणक्यांनी तात्पुरतीच धारण केलेली महाअमात्यपदाची जबाबदारी कुशल राक्षसावर सोपविली.

मंत्रीश्वर राक्षस पुनश्च मगधाचा महाअमात्य बनला !

□



# चंद्रगुप्ताचे साम्राज्य

कात्यायन राक्षस चंद्रगुप्ताच्या मगध साम्राज्याचा महाअमात्य झाला. चाणक्य हे पद भूषवित असतानाही कधी राजप्रासादात राहिला नव्हता. तो एखाद्या तपस्व्याप्रमाणे नगरीबाहेरील पर्णकुटीत राहात असे. आणि तिथूनच राजाला व प्रजेला मार्गदर्शन करीत असे. मुद्राराक्षसात चाणक्याच्या पर्णकुटीचे वर्णन आहे—

उपलशकलमेतद् भेदकं गोमयानां
बटुभिरुपहृतानां बर्हिषां स्तोम एषः ।
शरणमपि समिद्भिः शुष्यमाणाभिराभि—
र्विनमितपटलान्तं दृश्यते जीर्णकुड्यम् ॥

—एका बाजूला गोवऱ्या तोडण्यासाठी असलेला दगडाचा तुकडा पडला आहे. दुसऱ्या बाजूला त्याच्या शिष्यांनी एकत्र केलेल्या कुशांचा ढीग लागलेला आहे. छपरावर चारी बाजूंनी समिधा वाळत घातलेल्या दिसत

आहेत. समिधांच्या भाराने त्याची झोपडी जणू एका बाजूला झुकत आहे आणि झोपडीच्या जीर्ण भिंती पडत झडत कशाबशा उभ्या आहेत.

मत्स्य पुराणाने चाणक्याचा ‘राजर्षि’ या शब्दाने गौरव केलेला आहे. चाणक्य अमात्य राहिला नाही तरी त्याचा सल्ला चंद्रगुप्त व अमात्य राक्षसाला सततच लाभत असे. हा दीर्घजीवी होता व वयाच्या ८२ व्या वर्षी निधन पावला, अशी आख्यायिका आहे. नर्मदातीर्थावरील शुक्ल-तीर्थावर वसतीस्थान असता चाणक्याला सिद्धी प्राप्त झाली होती, अशीही आख्यायिका प्रचलित आहे.

चाणक्याच्या संदर्भात अनेक तऱ्हेच्या आख्यायिका प्रचलित आहेत. त्यांच्या खरे–खोटेपणाबद्दल भिन्न भिन्न मते आहेत, पण एका विशाल भारतीय साम्राज्याचा व एका शूर, सुलक्षणी आणि प्रजाहितदक्ष राजाचा हा स्फूर्तीदाता निर्माता होता हे सत्यच आहे! भारतीय इतिहासात चाणक्याचे स्थान सदैव आदरणीयच राहिले आहे

चंद्रगुप्ताने आपले साम्राज्य बरेच वाढविले होते. सिकंदरने भारतात जिंकून घेतलेल्या प्रदेशाचे सहा विभाग केले होते व ते निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिले होते. सिंधू नदीच्या पूर्वेकडील तीन प्रांतांवर ग्रीक अधिकाऱ्यांचा अंमल होता. ओकज्यार्टेस हा काबूलचा मुख्य होता, सिंधूच्या पश्चिमेकडील भाग निकेनोर याच्या ताब्यात होता. ग्रीक सैन्य-प्रमुख फिलिप सेनापती होता. सिंधमध्ये पायथॉन नामक सेनानी होता. सिंधू ते झेलमपर्यंतचा प्रदेश आम्भी राजाचा, झेलमपासून भारताच्या मध्यापर्यंतचा प्रदेश पुरुच्या व अन्य उरलेला प्रदेश अभिसार राजाच्या ताब्यात होता. चंद्रगुप्ताने भारतामधली ग्रीकांची राज्यसत्ता पार नष्ट करून टाकली.

सिकंदरच्या मृत्यूनंतर त्याचा सेनापती सेल्यूकस निकेटर हा खरोखरच ‘निकेटर’ म्हणजे विजेता बनला होता. बाबिलोनपासून तक्षशिला आणि

सिंधूसौवीरपर्यंत सिकंदरच्या मनात असलेले साम्राज्य निर्माण करून आपण त्याचे सम्राट बनायचे अशी महत्त्वाकांक्षी स्वप्ने तो पाहू लागला होता. आणि त्यांच्या पूर्तीसाठी महाबलाढ्य अशी सेना घेऊन गांधारच्या दिशेने पुढे निघाला होता. तो सिंधू नदीपर्यंत आला तेव्हाच चंद्रगुप्ताने त्याचा मार्ग रोखला. सिकंदरच्या आक्रमणाइतकेच सेल्यूकसचे आक्रमण भयंकर होते, पण सिकंदरच्या वेळेस भारतामधली दुबळी व विस्कळित राजकीय परिस्थिती पालटून तिथे चंद्रगुप्तासारख्या वीर पुरुषाच्या हाती प्रबळ राज्यसत्ता निर्माण झालेली होती. त्यामुळे सनपूर्व ३०५-३०४ च्या दरम्यान झालेले आक्रमण चंद्रगुप्ताने मोठ्या धैर्याने परतवून लावले. सेल्यूकसला येथे ' निकेटर ' तर होता आलेच नाही, पण चंद्रगुप्ताशी तह मात्र करावा लागला. या तहाच्या अटी पाहिल्यावर सेल्यूकसला चंद्र-गुप्ताने जबर तडाखा दिला होता, हे उघड होते. कारण युद्धात लाचार झाल्याशिवाय कोणताच सेनानी अशा अटी मान्य करणार नाही. या करारानुसार चंद्रगुप्ताने सेल्यूकसला ५०० हत्ती भेट म्हणून दिले होते, तर त्याच्या बदल्यात सेल्यूकसने चंद्रगुप्ताला एरिआ, एराकोशिआ, जेड्रो-शिया आणि पैरोपैमिसडाई हे चार प्रांत बहाल केले होते. हे चारही प्रांत सिंधू नदीच्या पश्चिमेस असून ते हैरात, कंदहार, मकराण व काबूल या प्रदेशात असावेत असे मानले जाते. अशा रीतीने चंद्रगुप्ताच्या साम्रा-ज्याची सीमा हिंदुकुश पर्वतापर्यंत पोचली होती. भौगोलिकदृष्ट्या हिंदु-कुश पर्वत ही साम्राज्याची निसर्गदत्त सीमा होती असे मानले जाते. स्मिथ नावाच्या इतिहासकाराने अशी उत्तम सीमा साम्राज्याला मिळविल्या-बद्दल चंद्रगुप्ताचे खूप कौतुक केले आहे. स्मिथ म्हणतो, " दोन हजारां-हून अधिक वर्षांपूर्वी एका भारतीय सम्राटाने आपल्या साम्राज्याला अशी उत्कृष्ट नैसर्गिक सीमा मिळविली. अशी निसर्गदत्त सीमा आपल्या साम्रा-ज्याला लाभावी यासाठी मागाहून आलेले इंग्रजदेखील प्रयत्नशील होते,

पण त्यांनाही ते जमले नाही व ते व्यर्थ तळमळत मात्र राहिले. सोळाव्या आणि सतराव्या शतकातील मोगल बादशहांनादेखील या सीमारेषेपर्यंत आपल साम्राज्य वाढविता आले नाही."

चंद्रगुप्त आणि सेल्यूकस यांच्यामधील तह दृढ करण्यासाठी व राजकीय स्नेह टिकविण्यासाठी सेल्युकसने आपल्या मुलीचा विवाह चंद्रगुप्ताशी लावून दिला होता. अशा रीतीने भारतीय व ग्रीस या तत्कालीन दोन प्रमुख संस्कृतींचे हे मीलनच घडले होते !

चंद्रगुप्ताने कलिंगखेरीज समग्र उत्तर भारत जिंकून घेतलेलाच होता. पश्चिम भारतात गुजरात-काठेवाडपर्यंत त्याची सत्ता पोचलेली होती, हे जुनागड येथील शक क्षत्रप रुद्रदामन याच्या उपलब्ध शिलालेखावरून कळते. पूर्वेला वंगालपर्यंत हे साम्राज्य पसरले होते. ग्रीक लेखकांनी बंगाल नंद-साम्राज्यात होता असे म्हटले आहे. चंद्रगुप्ताने सर्व नंद साम्राज्या-बरोबर वंगालही जिंकून घेतला. दक्षिणेकडे मात्र चंद्रगुप्ताच्या साम्राज्याचा विस्तार कोठवर झालेला होता, हे निश्चित सांगता येत नाही. अशोकाच्या काळी एक तामिळनाडू सोडून बाकीचा सर्व दक्षिणप्रदेश मौर्य साम्राज्या-खाली होता. मधल्या बिंदुसार राजाने दक्षिणेतला बराच प्रदेश जिंकला होता असेही एक मत आहे. तथापी, म्हैसूरच्या काही शिलालेखांवरून तिथपर्यंत चंद्रगुप्ताचे साम्राज्य पसरलेले होते असे आढळते. तामिळनाडू, आंध्र व कलिंग हे प्रदेश वगळून राहिलेल्या सर्व शेष भारतावर आणि अफगाणिस्तान व बलुचिस्तानावर चंद्रगुप्ताची अधिसत्ता प्रस्थापित झाली होती असे दिसते.

चंद्रगुप्ताच्या साम्राज्याविषयी माहिती देणारी दोन साधने उपलब्ध आहेत. एक चाणक्याचा 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ व मेगॅस्थनीस याचा 'इंडिका' नामक ग्रंथ. मेगॅस्थनीस हा सेल्यूकस चंद्रगुप्ताच्या तहान्वये चंद्रगुप्ताच्या दरबारी राहिलेला ग्रीक वकील होता. याने 'इंडिका'

नावाचा ग्रंथ लिहिला होता. आज तो मूळ स्वरूपात उपलब्ध नसला तरी त्यातील अनेक उतारे अन्य ग्रीक लेखकांनी आपल्या ग्रंथातून उद्धृत केलेले आहेत. त्यावरून तत्कालीन परिस्थितीवर पुष्कळच प्रकाश पडतो. मेगॅस्थनीस न्याय व शासन या कामासाठी बहुतेक वेळ दरबारातच असे. त्यामुळे त्याने बारीकसारीक गोष्टीही पाहून नमूद केल्या आहेत. राजा दिवसा झोपत नसे व राजा मालिश करून घेत असतानाही लोकांना भेटून त्यांची गाऱ्हाणी ऐकत असे, तसेच केशप्रसाधनाच्या वेळीही तो दूतांची भेट घेऊन त्यांच्याकडील समाचार ऐकत असे, असे त्याने लिहिले आहे. राजाच्या जिवाला धोका पोहोचू नये म्हणून कशी खबरदारी घेतली जाई यासंबंधी मेगॅस्थनीसने सविस्तरपणे लिहिले आहे तो लिहितो की, राजाला त्याच्या कामात मदत करण्यासाठी अनेक मंत्री होते. ज्या व्यक्तींच्या गुणांची आणि चारित्र्याची बरोबर पारख झाली आहे, अशा व्यक्तींची मंत्रिपदावर नेमणूक केली जाई. अर्थशास्त्रात अशा १८ मंत्र्यांचा व उच्च अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे. त्यातही मंत्री, पुरोहित, सेनापती व युवराज हे सर्वश्रेष्ठ मानले जात असत. त्यांना प्रतिवर्ष ४८,००० पण मिळत असत. 'पण' हे एका नाण्याचे नाव आहे. ऐंशी कवड्या म्हणजे एक 'पण' होई. स्मिथने एका शिलिंगाच्या जवळपास 'पण' नाण्याची किंमत केली आहे.

राजाच्या अंतर्गत मंत्रिमंडळात वरील चार पदाधिकारी प्रामुख्याने असत.

त्यानंतर सन्निधाता, प्रशास्ता, समाहर्ता, दौवारिक आणि आन्तर्वंशिक हे पदाधिकारी होते. त्यांना प्रतिवर्ष २४,००० पण मिळत असत. सन्निधाता हा कोशागार, कोष्ठागार व आयुधागार यावरील मुख्याधिकारी होता. प्रशास्ता हा सूचना विभागाचा प्रमुख होता व राजाचे आदेश, आज्ञा, पत्रे त्याच्या द्वारा लिहिली जात असत. राज्यातील सर्व वसूल

पाहण्याचे काम समाहर्ता याचे असे. पाच किंवा दहा गावांची देखरेख करणारे गोप व जिल्ह्यावर देखरेख ठेवणारे स्थानिक हे समाहर्ताला त्याच्या कामात मदत करीत असत. दौवारिक हा राजभवनाच्या द्वारावरील अधिकारी होता. राजाच्या भेटीसाठी येणाऱ्यांना वेळ देणे, त्यांची सर्व प्रकारची माहिती मिळविणे, त्यांना दरबारी रीतिरिवाज सांगणे आदी कामे त्याच्याकडे असत. आन्तर्वंशिक हा राजाच्या अंत:पुरातील मुख्याधिकारी होता.

यानंतर तृतीय श्रेणीच्या पदाधिकाऱ्यांत मंत्रिपरिषदेचे सदस्य, पौरव्यावहारिक, राष्ट्रपाल, अन्तपाल, कार्मान्तिक आणि नायक हे असत. राजा आणि त्याचे अधिकारी यांमध्ये दुवा साधण्याचे काम मंत्रिपरिषद करत असे. पौरव्यावहारिक हा जिल्हान्यायाधीश असे, राष्ट्रपाल हा प्रांताचा अधिकारी असे, अन्तपाल सीमेचे रक्षण करी, राजकीय शिल्पशाळेचा प्रमुख कार्मान्तिक असे व नायक हा पोलीस विभागाचा मुख्याधिकारी होता.

अशा प्रकारे आणखीही काही श्रेणीतील अधिकारी असत व त्यांच्यामार्फत राज्यकारभार चाले.

चाणक्याने अर्थशास्त्रात दूतांचीही चर्चा केली आहे. दूत तीन प्रकारचे असत. पूर्ण अधिकार देऊन धाडलेल्या दूताला ‘ निसृष्टार्थ ’ असे म्हटले जाई, मर्यादित अधिकार देऊन धाडलेल्या दूताला ‘ परिमितार्थ ’ व ज्याला काही विशेष आदेश देऊन धाडले जाई त्याला ‘ शासनहर ’ असे म्हटले जाई.

चंद्रगुप्ताच्या प्रशासनाचे वर्णन खालील शीर्षकान्वये करण्यात येते— ( १ ) सैनिक प्रशासन, ( २ ) नगर प्रशासन, ( ३ ) जनपद प्रशासन, ( ४ ) न्याय प्रशासन, व ( ५ ) आय आणि व्यय.

चंद्रगुप्ताच्या पदरी विशाल सेना होती. तिच्यात ६,००,०००

पदाती, ३०,००० अश्वारोही, ९,००० हत्ती व त्यावर आरूढ होणारे ३६,००० गजारोही व कित्येक हजार रथ व सारथी होते.

मगधाची राजधानी ‘पाटलीपुत्र’ शहर याचे वर्णन मेगॅस्थनीसने केले आहे. गंगा व हिरण्यवाह यांच्या संगमावर हे शहर वसलेले होते. त्याची लांबी नऊ मैल व रुंदी पावणेदोन मैल होती. लाकडी तटबंदीने हे शहर घेरलेले होते, त्यावर ५७० मीनार किंवा बुरुज होते आणि नगरीला ६४ प्रमुख अशी प्रवेशद्वारे होती. चोहोंबाजूंना ६०० फूट रुंदीचा व ६० फूट खोलीचा खंदक होता.


पाटलीपुत्र नगरीतला चंद्रगुप्ताचा महाल ही प्रेक्षणीय वास्तू होती. सोनेरी वेल व चांदीचे पक्षी यांनी विभूषित असे स्वर्णखचित स्तंभ होते. नक्षीदार आसने व सोनेरी पात्रे यांनी हा महाल सुसज्जित होता. मेगॅस्थनीस तर म्हणतो की, ‘या महालापुढे सूसा व एकबटाना येथील महाल अगदीच फिके आहेत.’ चंद्रगुप्ताच्या महालातील उद्यानात पाळीव मोर, अनेक देशी व विदेशी वृक्ष-वेली-फुले होती. जवळच्या जलाशयात मोठमोठे मासे होते. राजाच्या अल्पवयस्क मुलांव्यतिरिक्त कोणालाही हे मासे धरता येत नसत. राजघराण्यातील लोक तिथे नौकाविहार करीत. चंद्रगुप्त आपला फुरसतीचा वेळ महालात काढीत असे. त्याच्या अंगरक्षक म्हणून सशस्त्र स्त्रियाच असत. राज्यकार्य, यज्ञ अथवा शिकार यासाठी तो राजमहालाच्या बाहेर जात असे. जवळच्या अंतरावर घोड्यावरून जाई व लांब अंतरावर हत्तीवरून जाई. रात्री तो अचानकपणे कधीही आपला शयनकक्ष बदलीत असे. त्यात कसल्या कपट-कारस्थानाला जागा मिळू नये, अशी त्याची योजना असे. राज्यकारभारात तो मोठ्या तत्परतेने लक्ष घालीत असे व जरूर भासल्यास अविश्रांत तो ते काम करीत असे. एखादे काम तो कधी अर्धवट सोडत नसे. अशा वेळी चार सेवक लाकडाच्या बेलण्याने त्याला मालीश करून त्याचा थकवा घालवीत

असत. कधी कधी तो हत्ती, उंट, गेंडे, बैल, बकऱ्या यांच्या टकरी व शर्यती पाहण्यात विरंगुळा मिळवी. शिकार त्याला फार प्रिय होती.

चोवीस वर्षांच्या सफल राजकीय कारकिर्दीनंतर चंद्रगुप्ताचे सनपूर्व २९६ मध्ये निधन झाले. मेगॅस्थिनीसच्या कथनानुसार तो यज्ञकार्यासाठी बाहेर जात असे, म्हणजे तो वैदिक धर्माविषयी आस्था बाळगणारा होता. पण जैन ग्रंथानुसार चंद्रगुप्ताने आपल्या शेवटच्या दिवसांत जैनधर्म स्वीकारला आणि जैनमुनी भद्रबाहु याच्याबरोबर तो दक्षिणेत गेला. तिथे श्रवण बेळगोळ येथे अनशनद्वारा त्याने शरीरत्याग केला.

चंद्रगुप्त मौर्य निःसंदेह भारतीय इतिहासाच्या गगनांगणातील चंद्र होता !

□



## बिंदुसार

चंद्रगुप्ताच्या अस्तानंतर त्याचा पुत्र बिंदुसार हा मगधाच्या राजसिंहासनावर राजा म्हणून आला. स्ट्रॅबो नावाचा ग्रीस इतिहासकार याला 'सॅनड्रोकोटस्'-म्हणजे चंद्रगुप्त याचा पुत्र किंवा वारस 'एलिट्रोकेटस्' या नावाने संबोधितो. हे नाव म्हणजे संस्कृतमधील 'अमित्रघात'-म्हणजे शत्रूंना मारणारा अथवा 'अमित्रखाद'-म्हणजे शत्रूंना खाणारा, या नावाचा तो ग्रीक अपभ्रंश असावा. अन्य इतिहासकारांनी बिंदुसाराला अशा अनेक नावांनी उल्लेखिले आहे. 'राजबलीकथा' नामक जैन ग्रंथात याला 'सिंहसेन' म्हटले आहे. काही विद्वानांच्या मते बिंदुसार राजाची

' अमित्रघात ' इत्यादी गौरव-बीरुदे असावीत.

जैन ग्रंथात बिंदुसाराच्या मातेचे नाव ' दुर्धरा ' सांगितले आहे. हे नावही वेगळे वाटते.

बिंदुसार राजाच्या कारकीर्दीची पूर्ण माहिती उपलब्ध नाही. चंद्रगुप्ताच्या पश्चात जे ग्रंथ लिहिले गेले त्यांमधूनच बिंदुसाराविषयीची थोडीवहुत माहिती मिळते.

हेमचंद्र व तारानाथ हे ग्रंथकार असेही सांगतात की, बिंदुसारच्या शासनकालीही काही काळ चाणक्य महाअमात्य म्हणून होता. तारानाथच्या कथनानुसार बिंदुसारने सोळा नगरे जिंकली व तो पूर्व समुद्रापासून ते पश्चिम समुद्रापर्यंतच्या भूप्रदेशाचा स्वामी बनला होता! आंध्र प्रदेश बिंदुसारनेच जिंकून घेतला होता. मेगॅस्थनीसच्या कथनानुसार त्यावेळी आंध्र प्रदेशात तीस नगरे होती व त्या राजांच्याजवळ १,००,००० पदाती, २,००० अश्व व १,००० हत्ती होते.

' दिव्यावदान ' ग्रंथानुसार बिंदुसारचा महाअमात्य ' खल्लाटक ' नावाचा होता व त्याच्यानंतर ' राधागुप्त ' महाअमात्य झाला.

चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीतही काही निष्कारण असंतुष्ट लोकांच्या हालचाली गुप्तरीतीने सुरू होत्याच. कपट-कारस्थाने होत होतीच. परंतु चंद्रगुप्ताच्या अदम्य शक्तीपुढे या असंतुष्टांना झुकावे लागले होते. दबावे लागले होते. चंद्रगुप्त असेतोपर्यंत ह्या असंतुष्टांनी कधी डोके वर काढले नव्हते. परंतु त्याच्या पश्चात नवा राजा दुर्बल आहे अशी समजून करून घेऊन त्या मंडळींनी बंडाचे निशाण तक्षशिलेमध्ये उभारले! परंतु हे पूर्ण सत्य दिसत नाही. कारण ह्या बंडाचा बीमोड करण्यासाठी जेव्हा बिन्दुसारने आपला प्रतापी पुत्र अशोक याला तिकडे धाडले तेव्हा अशोकाच्या मार्गातच तक्षशिलेच्या लोकांनी येऊन त्याला सांगितले की, " महाराज! आम्ही राजकुमारांच्या विरोधी नाही किंवा सम्राटांच्याही विरोधी नाही.

परंतु आमचा सतत अपमान करून आम्हांला तुच्छ लेखणाऱ्या निर्दयी मंत्र्यांविरुद्ध आम्ही उठलो आहोत !"

यावरून हे सिद्ध होते की, तक्षशिलेचे बंड हे मगध सत्तेविरुद्ध नव्हते तर उर्मट, निर्दय अधिकाऱ्यांविरुद्ध होते. यावरून हेही दिसून येते की, त्यावेळी प्रांतीय अधिकारीही मातलेले असावेत व बिंदुसारच्या प्रांतीय शासकीय व्यवस्थेत काहीशी ढिलाई उत्पन्न झालेली असावी.

बिंदुसारचे पालनपोषण ग्रीक राणीच्याच नाही तर अनेक ग्रीक युवतींच्या सान्निध्यात राजमहालात झाले होते. त्यामुळे बालपणापासूनच बिंदुसारच्या मनी विदेशी लोकांविषयी आकर्षण उत्पन्न झालेले असावे. त्याने आपला पिता चंद्रगुप्त व ग्रीक यांचे संबंधही पाहिले असावेत. त्याने हेही पाहिले होते की, विदेशी लोकांच्या देखरेखीखाली चंद्रगुप्ताने एक स्वतंत्र वेगळा विभागच निर्माण केलेला होता. यामुळेच बिंदुसारची परदेशनीती स्नेहाची, मैत्रीची राहिली होती. त्याने जोडलेल्या भिन्न भिन्न परदेशी संबंधांची माहिती दुर्दैवाने उपलब्ध नाही. परंतु ग्रीकांच्या व त्याच्यामधील स्नेहसंबंधाची माहिती तेवढी मिळते. ग्रीक इतिहासकारांनी ॲन्टिओक, सोटर व बिंदुसार यांच्यामधील पत्रव्यवहाराचा एक नमुना जपून ठेवलेला आहे. त्यावरून कळते की, मौर्यसम्राट बिंदुसार याने सीरियाचा सम्राट ॲन्टिओक याच्याकडे 'मधुर मध, अंजीर व एक तत्त्वज्ञानी' यांची मागणी केली होती. त्याच्या ग्रीक मित्रांनी मधुर मध व अंजीर धाडले व कळविले की.—

"ह्या वस्तू धाडताना मला मोठा आनंद होत आहे, परंतु दुर्दैवाने आपली तिसरी मागणी पूर्ण करता येत नाही, कारण या देशाच्या कायद्यानुसार तत्त्वज्ञ पाठविता येत नाही."

मेगॅस्थनीसच्या पश्चात डेमाकस नावाचा दुसरा राजदूत सीरियाच्या

सम्राटाने बिंदुसारच्या दरबारी धाडला होता. परंतु हा राजदूत बिंदू-सारच्या की अशोकाच्या दरबारी आला होता हे निश्चित सांगता येत नाही.

मौर्यसम्राट चंद्रगुप्ताने दक्षिणेतील अधिकांश भूभागावर सत्ता मिळविली होती, पण आंध्र-विजय करून दक्षिणेतील मौर्य साम्राज्य बिंदू-सारने विस्तारले होते.

बिंदूसारला सोळा राण्या व एकशे एक पुत्र होते. 'दिव्यावदान' ग्रंथात अशोकाच्या दोन भावांची नावे दिली आहेत. एक ' सुसीम ' व दुसरा ' विगताशोक '. सिंहली जनश्रुतीनुसार ह्यांनाच ' सुमग ' व ' तिष्य ' म्हटले जाते.

पुराणांच्या मते बिंदुसारने २५ वर्षेपर्यंत राज्य केले. बौद्ध ग्रंथ हा काळ २७–२८ वर्षे मानतात. काही असो, एक मात्र खरेच आहे की, चंद्रगुप्तानंतर त्याच्याइतका पराक्रमी, मुत्सद्दी असा त्याचा हा पुत्र बिंदूसार जरी नसला तरी त्याने २५ वर्षेपर्यंत चंद्रगुप्ताने कमावलेले प्रचंड साम्राज्य समर्थपणे सांभाळले; एवढेच नाही तर त्याची वाढही केली.

BVBK-0402269

म. ग्रं. सं. ...
क्रमांक २२६९ दिनांक २४।१०।८८
विषय ५१।८१